
# जावईबापूंच्या गोष्टी

द. मा. मिरासदार






# जावईबापूंच्या गोष्टी

द. मा. मिरासदार

मेहता पब्लिशिंग हाऊस

**JAWAI BAPUNCHAYA GOSHTI** by D. M. MIRASDAR

जावईबापूंच्या गोष्टी **:** द**.** मा**.** मिरासदार / विनोदी कथासंग्रह

द. मा. मिरासदार

१२६०, अक्षय सहनिवास, तुळशीबागवाले कॉलनी, सहकारनगर नं.२, पुणे – ४११००९.

© सुनेत्रा मंकणी

प्रकाशक : सुनील अनिल मेहता, मेहता पब्लिशिंग हाऊस, १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे – ४११०३०. ✆ ०२०-२४४७६९२४

Email : info@mehtapublishinghouse.com

Website : www.mehtapublishinghouse.com

# अनुक्रम


मामा भुर्र्र्र्र...!
उच्च स्थानी बसावे
सूर्याची पिल्ले!
वैद्याचा धंदा
डोक्याचे माप
भुताशी झटापट
ताप उतरला
जावईबुवांचा कीचकवध
'श्री' लहान झाली!
अस्वल आणि चोर

# मामा भुर्रर्रर्र...!

एक जावईबुवा होते. दिसायला मोठे राजिंबडे. गोरेपान, सरळ नाकाचे आणि गुटगुटीत अंगाचे. पण डोक्याच्या नावाने आनंद होता. डोक्यात त्यांच्या काय भरले होते देव जाणे. कुणी म्हणत कांदे असावेत. कुणी म्हणत बटाटे असावेत. कुणी म्हणायचे गोलगोल गोटे असावेत नर्मदेतले. पण खरे सांगायचे म्हणजे त्यांचे डोके अगदी रिकामे होते. पोखरलेला नारळ असतो ना, तसे! किंवा रिकामे खोकेच म्हणानात. असे हे बुवाजी गावात करीत तरी काय? काही नाही. दोन्ही वेळेला तालमीत जाऊन व्यायाम करावा, खूप दूध प्यावे आणि गावातून भटकावे. ते दुपारीही झोपायचे आणि अंधार पडला की रात्रीही झोपायचे. जावईबुवा घरचे बरे होते. घरदार, शेतीवाडी चांगली होती. काही नाही केलं तरी दोन्ही वेळेला छान जेवायला मिळायचे.

कुठल्या सासऱ्याने त्यांना मुलगी दिली कोण जाणे! पण जावईबुवांचे एकदाचे लग्न झाले आणि ते 'जावईबुवा' बनले. चारसहा महिने गेले. दिवाळी आली. सासऱ्यांनी दिवाळसणासाठी आमंत्रण पाठवले. पत्रात लिहिले, "दिवाळी यंदा आमच्याकडेच करावी अशी आमची इच्छा आहे. तरी सगळ्यांनी अवश्य यावे. आम्हाला फार आनंद होईल..."

हे पत्र वाचल्यावर जावईबुवा वडिलांना म्हणाले, "यंदा आपल्या गावात दिवाळीला सरकारने बंदी केली काय, बाबा?"

वडील म्हणाले,

"शतमूर्खा! अरे, असा या पत्राचा अर्थ नाही."

"मग?"

"तू त्यांचा जावई आहेस ना? दिवाळसण देण्यासाठी त्यांनी बोलावलं आहे, समजलं?"

जावईबुवांच्या रिकाम्या डोक्यात एकदम बत्ती पेटल्यासारखा उजेड पडला. त्यांनी दोन्ही हातांनी चुटक्या वाजवल्या.

"हां हां! आता आलं लक्षात. म्हणजे दिवाळीत आपण पोस्टमनला बक्षीस देतो, मोलकरणीला देतो, पोस्त का काय म्हणतात तेच ना? तसंच मला पण पोस्त देणार आहेत काय आमचे सासरे? वा वा! मग फार मजा होईल. अजूनपर्यंत एकाही गाढवानं मला कधी पोस्त दिलं नाही बघा."

वडील लालबुंद चेहरा करून खेकसले, "हात मूर्खा! अरे, तू काय गडीमाणूस आहेस पोस्त घ्यायला? जावई आहेस जावई, समजलं? सासुरवाडी चांगली श्रीमंत आहे तुझी. सोन्याचं कडं, अंगठी, भिकबाळी असलं काहीतरी देतील तुला सासरे. आणखीन तुला काही पाहिजे असलं तर माग की लेका. रुसून बस. म्हणजे सगळं मिळतंय बघ. मी सांगतो तसं करायचं. आपली अक्कल चालवायची नाही."

जावईबुवांनी डोळे मिटून घेतले. क्षणभर विचार केला. मग मान हलवून ते म्हणाले,

"बराय, आपल्याला काय? तुम्ही सांगाल तसं करतो."

झाले. जावईबुवांचे सासुरवाडीला जायचे नक्की ठरले. वडिलांनी सूनबाईंना अगोदरच पाठवून दिले. जावईबुवांची जाण्याची सगळी तयारी केली. चारदोन नवे कपडे शिवले. फराळाचे सामान दिले. जावईबुवांचे घर खेड्यात. सासुरवाडीही खेड्यातच. जायला मोटार नव्हती, काही नव्हते. बैलगाडीने तरी जायचे किंवा घोड्यावर बसून. जावईबुवांच्या घरचे एक तट्टू होते ते घेऊन जायचे ठरले. तयारी करता करता दिवाळी अगदी जवळ येऊन ठेपली. निघायचा दिवस उजाडला.

वडिलांनी चिरंजीवांना उपदेश केला–

"हे बघ, स्वत:ची अक्कल फारशी पाजळायची नाही. मी सांगतो तसं करायचं."

"अर्थातच! हे मी मागंच कबूल करून टाकलं आहे, बाबा." जावईबुवांनी मान डोलवली.

"सासुरवाडीला गेल्यावर अगदी ऐटीत वागायचं. असं गबाळयासारखं नाही रहायचं. सगळयांवर कशी आपली जोरदार छाप पडली पाहिजे. सगळयांना मनातून दरारा वाटला पाहिजे."

"ते लागलं माझ्याकडं. गेल्या गेल्या एकेकाची तंगडी मोडून टाकतो. म्हणजे असा दरारा वाटेल सगळयांना की यंव!" जावईबुवा नाक फुगवून अभिमानाने बोलले.

"हात् मूर्खा! सासुरवाडी म्हणजे काय तालीम-बिलीम समजलास की काय? तसलं काही करायचं नाही. आलं लक्षात? रुबाबात वागायचं, रुबाबात!"

"ठीक आहे; आमच्या बापाचं काय जातं? रुबाबात वागतो."

"शाबास! फारसं कुणाशी बोलायचं नाही. अगदी बेतास बात. बोललं तरी अगदी मोजकं. अगदी हळू. किती हळू?"

"अजिबात कुणाला ऐकू येणार नाही इतकं! बरोबर आहे ना?"

"गाढवा! इतकं हळू नाही. थोडं हळू... कुठेही गेलं तरी उच्च स्थानी जाऊन बसावं. गंभीर मुद्रा असावी. बायकांशी फारसं बोलू नये. सगळयांची प्रेमळपणानं चौकशी करावी."

जावईबुवा खो खो हसून म्हणाले,

"हे तर अगदीच सोपं आहे बाबा. अगदी बरोबर करतो. बराय, मी निघतो."

जावईबुवा वडिलांच्या पाया पडून तट्टावर बसले. बरोबरचे सगळे सामान पडशीत नीट कोंबले. मग तट्टाचा लगाम हाती घेऊन त्यांनी घोड्याला इशारा केला. तेवढ्यात वडिलांनी चिरंजीवांना पुन्हा थांबवून सांगितले, "हे बघ, सासू-सासरे यांची गाठ पडल्याबरोबर त्यांना नमस्कार करायचा आणि त्यांना म्हणायचं, 'मामा नमस्कार, मामी नमस्कार'... समजलं?"

सकाळपासून उपदेश ऐकून ऐकून जावईबुवा कंटाळले होते. त्यांचे रिकामे डोके

गरगरायला लागले होते. तोंड वेडेवाकडे करून ते म्हणाले,

"आता हे सगळं कसं लक्षात ठेवायचं बुवा? विसरून-बिसरून गेलो तर?"

"छे: छे:! हे शिष्टाचार आहेत. नाही पाळले तर वाईट दिसेल. तू आपलं असं कर. मामा नमस्कार... मामी नमस्कार... असं सारखं घोकतच जा ना वाटेनं. म्हणजे विसरणार नाहीस."

ही कल्पना जावईबुवांना एकदम पटली.

तट्टाला चुचकारून ते घोकतच निघाले एकसारखे.

"मामा नमस्कार... मामी नमस्कार."

हळूहळू सकाळ उलटली. दुपार झाली. उन्हे चांगली तापली. जावईबुवांचे डोके चांगलेच तापले. पण तिकडे लक्ष न देता ते जोराने तट्टू पिटाळीत होते आणि मनाशी घोकीत होते, "मामा नमस्कार... मामी नमस्कार."

थोड्या वेळाने वाटेत एक मोठे वडाचे झाड लागले. त्या झाडावर दुपारच्या वेळी कितीतरी पाखरे सावली धरून बसली होती. वडाखालून जावईबुवा चालले. त्यांच्या एकदम ध्यानात आले की, तट्टू लेकाचे फार हळू चालते आहे. चकचक करून काही उपयोग होत नाही. शेवटी त्यांनी पडशीतला चाबूक काढला आणि त्याचा काडकन आवाज हवेत केला. त्या शांत वेळेला तो आवाज फार मोठा निघाला. झाडावरची पाखरे एकदम घाबरून भुर्र्र्र्रकन् उडाली. त्यांचे थवेच्या थवे उडाले आणि भुर्र्र... असा मोठा आवाज झाला. जावईबुवा मनाशी घोकीत चालले होते. ते एकदम दचकले. तो आवाज त्यांच्या रिकाम्या डोक्यात जाऊन पोहोचला आणि पक्का झाला. काहीतरी गडबडगोंधळ झाला खरा. अन् जावईबुवा इकडं मनाशी घोकत पुढे निघाले,

"मामा भुर्र्र... मामी भुर्र्र..."

संध्याकाळ झाली. अंधार पडू लागला. सासुरवाडीचे गाव अगदी हाकेच्या टप्प्यात आले तरी जावईबुवा घोकीतच होते,

"मामा भुर्र्र... मामी भुर्र्र..."

अखेर सासुरवाडीच्या दारापाशी घोडे थांबले. जावईबुवा खाली उतरले. जावई आल्याची वर्दी सगळीकडे गेली. गडीमाणसं धावत आली. सासूबाई आल्या. सासरे आले. आसपासचे लोक कौतुकाने सावकाराच्या जावयाकडे पाहू लागले. जावईबुवांनी सगळयांच्या तोंडाकडे दृष्टी टाकली. मग ऐटीत पावले टाकीत ते पुढे गेले. सासऱ्यांना नमस्कार करून ते मोठ्यांदा म्हणाले,

"मामा भुर्र्र..."

सासरे दचकलेच. आ करून बघायला लागले. तेवढ्यात जावईबुवांनी सासूबाईंना नमस्कार केला. पुन्हा ते मोठ्यांदा म्हणाले,

"मामी भुर्र्र..."

सासूसासरे घाबरून गेले. आसपासची माणसे मोठमोठ्यांदा हसू लागली. जावईबुवांना

काही कळले नाही. तेही खो खो करून हसू लागले.

□

# उच्च स्थानी बसावे

जावईबुवा सासुरवाडीला येऊन पोहोचले एकदाचे. "मामा भुर्रर्र" करीत घरात येऊन दाखल झाले. मग काय विचारता धांदल सगळ्यांची! सासरे, सासूबाई, मेहुणे, मेहुण्या सगळ्यांची धावपळ सुरू झाली नुसती. अहो, काही झाले तरी जावईबुवा! त्यातून पहिल्यांदाच सासुरवाडीला आलेले! मग त्यांचा मानसन्मान, थाटमाट नको का करायला? मेहुणीने गरम पाणी आणून दिले, मेहुण्याने पायावर पाणी घातले. सासरेबुवांनी पाय पुसायला पंचा दिला. एकूण जावईबुवांचा मोठा थाट झाला.

थोरल्या मेहुण्यांनी जावईबुवांना बैठकीत तक्क्याशी बसवले आणि ते घरात गेले. तोंडबिंड धुणे झाले. सासूबाईंनी फराळाचे ताट बाहेर आणले. चकल्या, कडबोळी, लाडू, शिरा. ताट कसे गच्च भरलेले होते.

ताट घेऊन सासूबाई बैठकीत आल्या. बघताहेत तर जावईबुवा कुठाहेत? जावईबुवा कुठेच दिसेनात. या खोलीत बघ, त्या खोलीत बघ, सगळीकडे हुडकाहुडकी झाली. पण स्वारी कुठे गडप झाली होती कोण जाणे! सगळ्यांनी एवढा मोठा वाडा पालथा घातला. कोपरान् कोपरा धुंडाळला. ओसरी, पडवी, माजघर, स्वैपाकघर. फार काय एकानं तर न्हाणीघर आणि बाळंतिणीची अंधारी खोलीपण धुंडाळली. धाकट्या मेहुण्याने वर माळवदावर जाऊन उंच वाढलेल्या गवतातही हात घालून पाहिला. दुसऱ्या एकाने घरातल्या धान्याच्या कणगीतही डोकावून पाहिले. पण नाही म्हणजे नाहीच! जावईबुवा कुठ्ठे कुठ्ठे दिसेनात. आं? हा काय प्रकार झाला बुवा? काही भुताटकी-बिताटकी तर झाली नाही? हे सद्गृहस्थ एकाएकी गडप झाले तरी कुठे?

सगळे अगदी घाबरून गेले. जावईबुवांची बायको तर रडायच्या बेताला आली.

शेवटी म्हातारे सासरे उठले. अंगणात गेले. तिथूनच त्यांनी मोठमोठ्यांदा हाका मारायला सुरुवात केली.

"जावईबुवा, अहो जावईबुवा–"

पहिल्यांदा काहीच उत्तर आले नाही. मग सासऱ्यांनी हाकांचा सपाटा सुरू केल्यावर अगदी हळू आवाजात लांबून कुठून तरी आवाज आल्यासारखा भास झाला.

"ओ–"

"आं? अहो आहात तरी कुठं?"

"हा नव्हे का इथंच!"

"इथं म्हणजे?"

"कडब्याच्या गंजीवर!"

कडब्याच्या गंजीवर? शाबास! सगळी माणसं आवाजाच्या दिशेने पळत सुटली.

अंगणातल्या बाजूच्या एका खोलीत गुरांसाठी मोठीच्या मोठी गंजी रचलेली होती. तिकडूनच आवाज येत होता नक्की. आत जाऊन पाहताहेत तर गंजी विस्कटलेली. कडब्याच्या पेंढ्या इकडे-तिकडे पडलेल्या अन् वर गंजीच्या टोकाला कडब्याच्या ढिगात जावईबुवा मांडी घालून ऐटीत बसलेले. त्यांच्या डोक्यातही कडब्याचा कचरा पडलेला. जावईबापूंची मूर्ती मोठी प्रेक्षणीय दिसत होती. त्यांना तिथं बसलेले बघून सगळेजण अगदी थक्क होऊन गेले.

थोरले मेहुणे चकित होऊन म्हणाले,

"भावजी, अहो हे काय? कुठं बसला आहात तुम्ही?"

जावईबुवा हळूच काहीतरी बोलले. पण कुणाला ते नीट ऐकू आले नाही.

"काय, म्हणताहात काय?"

पुन्हा जावईबुवांनी ओठांची हालचाल केली. पण कुणाला काही ऐकू आले नाही. सगळ्यांनी ओरडून ओरडून विचारले. पण जावईबुवांचा शब्दही कुणाला कळेना. जावईबुवांची बायको अगदी शरमून गेली. रागीट चेहरा करून ती म्हणाली,

"काय बोलताहात ते ऐकूही येत नाही धड मेलं! अहो मोठ्यांदा बोला की! असं काय करताहात? अहो–"

यावर "ओ ऽऽऽ" करून जावईबुवांनी एवढ्या मोठ्यांदा आरोळी ठोकली की, सगळ्यांच्या एकदम कानठळयाच बसल्या. काही जणांनी तर कानांत बोटेच घातली.

"हे काय चाललंय वेड्यासारखं?"

जावईबुवा मान हलवून बोलले,

"वेड्यासारखं नाही हं. आमचे दादा म्हणाले की, हळू बोलावं. म्हणून हळू बोललो..."

"अहाहा, दिवे ओवाळा दिवे!" बायको ठसक्यात बोलली.

"इथं आणून दे. म्हणजे ओवाळतो. पण कुणाला ओवाळायचं ते नाही सांगितलंस?"

बायकोने कपाळाला हात लावला. हताश होऊन सगळ्यांकडे पाहिले. सगळेजण टकमका आपल्याकडेच पाहताहेत हे बघून जावईबुवा खूश झाले. ते प्रेमळपणाने बायकोला हाका मारू लागले.

"शुक शुक! ए, चल वर ये. आपण दोघंही बसू घटकाभर इथं. फार मजा वाटतेय. मी तुझ्या मांडीवर डोकं ठेवून पडतो जरा वेळ."

"इश्श!"

"इश्श नाही आणि फिश्श नाही. हं चल, चल लवकर. आटप, आटप–"

हाताने चुटक्या वाजवून जावईबुवा गडबड करू लागले तेव्हा बायको बिचारी धूम पळाली. बाहेर जाऊन उभी राहिली. इतका वेळ सगळे नुसतेच उभे होते. मग एकेकाने तोंड उघडले.

"जावईबुवा, अहो फराळबिराळ करायचा का नाही?"

"वा वा! फराळ करायचा ना?"

"मग उतरा पाहू खाली."

"अं हं! इथंच आणून द्या सगळं. वरच्च्यावर बसून चापतो. आणा, आणा लवकर. सडकून भूक लागलीय मला."

"बैठकीत चला ना मग?"

"छ्या: छ्या:ऽऽ"

सगळ्यांनी खूप आग्रह केला. पण जावईबुवा काही खाली उतरायला तयार होईनात. शेवटी सासरे हात जोडून म्हणाले की, खाली येऊन फराळ करून पुन्हा वर बसा. तेव्हा मात्र जावई जरा विचारात पडले. डोके करकरा खाजवू लागले.

"पण-पण आमच्या वडिलांनी सांगितलं होतं–"

"काय?"

"नेहमी उच्च स्थानी बसावं. आपली जागा कधी सोडू नये म्हणाले. अगदी बजावून बजावून सांगितलं मला त्यांनी."

"म्हणून तुम्ही गंजीवर बसलात काय?"

"अर्थात–" जावईबुवांनी छाती फुगवली.

"सबंध घरभर हिंडलो. म्हटलं सगळ्यात उंच जागा तरी कोणती? शेवटी ही गंजी दिसली. म्हटलं द्या टाळी. सापडली रे सापडली. मारला धोतराला काचा अन् चढलो वर न् काय? काय, बरोबर आहे की नाही?"

"बरोबर आहे. बरोबर आहे." सगळ्यांनी एकदम माना डोलवल्या.

"पण आता मात्र खाली या."

"येऊच म्हणता?"

"या या. नाही म्हणू नका."

"पण खाली कसा उतरू?" जावईबुवांनी खाली एकदा डोकावून पाहिले अन् डोळे विस्फारले.

"का हो?"

"मला चढता येतं हो. पण उतरताच येत नाही. हा: हा:! लहानपणापासून माझा हाच घोटाळा होतो बुवा. लहानपणी किनई मी माकडासारखा चढायचा झाडावर सरसर... पटकन फांदीवर जाऊन बसायचा कुठल्याही. भारी जंमत!"

मेहुणा ओरडला,

"मग त्यावेळी खाली कसे येत होता?"

"त्यावेळी मी खिशात कुऱ्हाडीचं पातंच घेऊन जायचा. खेळ संपला रे संपला की झाडाची लहानशी फांदी तोडायची अन् कुऱ्हाडीला दांडा ठोकायचा. मग याच कुऱ्हाडीनं आपण बसलेली फांदी कचाकच तोडायची. तास-अर्ध्या तासात काड्दिशी फांदी मोडायची की, धप्पदिशी खाली यायचा मी! फार मजा बुवा! हा: हा:!" जावईबुवा मोठमोठ्यांदा हसू लागले. "कसा यायचा सांगू?"

“कसा?”

“हा असा–”

असे म्हणून जावईबुवांनी एकदम अंग घुसळले. लंकेवर उड्डाण करायला निघालेल्या मारुतीसारखी एकदम किरण मारली. धाड्दिशी ते खाली आपल्या मेहुण्यांच्या अंगावर आपटले. दोघांची कपाळे एकमेकांच्या कपाळांना आपटून दोघांनाही मोठी टेंगळे आली. धाकटा भाऊ जो कोलमडला तो आपल्या वडिलांच्या पायात पाय अडकून धब्दिशी कोसळला. म्हातारे सासरेही भुईवर आदळले आणि घाबरून मोठ्यांदा ओरडले. पडतापडता आधार म्हणून त्यांनी जवळच्या गड्याचे पाय धरले अन् ओढले. त्याबरोबर तोही रप्कन खाली आपटला अन् घाबरून ओरडला. इतक्या जोराने ओरडला की, त्याच्याजवळचा दुसरा गडी नुसता घाबरूनच खाली आपटला. त्याने त्याच्यापेक्षा जोरात किंकाळी फोडली. पत्त्याच्या बंगल्यातला एक पत्ता काढल्यावर सगळे पत्ते जसे भराभर एकमेकांवर पडून खाली पडतात तसे झाले. सगळेच ओरडू लागले. ते बघून जावईबुवांची बायको रडू लागली. आतून धावत आलेल्या सासूबाई रडू लागल्या. सगळा नुसता गोंधळ उडाला. वाड्याबाहेरून जाणारे लोक धावतपळत आत आले. अंगणात ही गर्दी झाली. जिकडेतिकडे रेटारेटी अन् मारामारी सुरू झाली. कुणाचा कुणाला पत्ता लागेना.

तोंडाला, अंगाला लागलेली माती झटकीत जावईबुवा उठून उभे राहिले. आश्चर्याने सगळ्यांकडे पाहात राहिले. मनात म्हणाले–

“कमाल झाली बुवा या लोकांची! एक साधी उडी मारली मी तर ती बघायला एवढी गर्दी! उद्या कुस्ती करून दाखवली तर अंगण पुरायचं नाही!”

□

# सूर्याची पिल्ले!

दिवसभर पाहुणचार जोरात झाला. जेवणीखाणी, गप्पागोष्टी. दिवस कसा गेला कळलेही नाही. जावईबुवा अगदी कंटाळून गेले. दिवसभर त्यांनी कसाबसा दम धरला. पण संध्याकाळी पाच वाजले तसा मात्र त्यांना दम निघेना. पाच वाजले की, त्यांना रोज आडवे व्हायची सवय. जेवणखाण आटोपून लगेच पडायचे, ते अंधार पडायच्या आत गुडूप. रात्र कधी होते आणि उजाडते कधी याचा पत्ता नाही. बारा तास खणखणीत झोप. अंगावरून हत्ती गेला तरी झोप मोडायची नाही. अंधार, रात्र, दिवे या गोष्टी कधी माहीतच नाहीत. पण आता सासुरवाडीला आली पंचाईत. इतक्या लौकर त्यांना झोपू कोण देतो?

संध्याकाळ झाली, तशी जावईबुवा लागले चुटक्या वाजवायला, जांभया द्यायला. त्यांचे डोळे चांगले मिटायला लागले. पण मेहुणे, मेहुण्या काही त्यांना झोपू देईनात. जेवणही कुणी लवकर वाढीना. मधूनमधून जावईबुवा पेंगायला लागले की, मेहुणे हलवून जागे करीत.

"अहो, जावईबुवा. उठा उठा. झोपता काय? अजून रात्रीचं जेवण व्हायचंय."

रात्रीचे जेवण साधे नव्हते. चांगला मेजवानीचा बेत होता. बाहेरचे चारदोन पाहुणे पंक्तीला बोलावलेले होते. मग जावईबुवांना कोण झोपू देणार? जावईबुवांनाही उपाशीपोटी झोपायची सवय नव्हती. दोन्ही वेळेला त्यांना भरपूर लागायचे. त्यांचीही पंचाईत झाली. इकडे डोळे तर चुरचुरताहेत, इकडे जेवण तर सोडवत नाही. आठ वाजेपर्यंत त्यांनी कसाबसा दम काढला. बाहेर चांगला अंधार पडला. घरात सगळीकडे दिवे लागले. एकेक माणसे घरात येऊ लागली. जावईबुवांना मोठी मजा वाटू लागली. बाहेरच्या अंधारात काहीच दिसेना. मग त्यांनी विचारायला सुरुवात केली.

"बाहेर असं काय झालंय हो? काही दिसत नाही, काही नाही." मेव्हणे हसून म्हणाले,

"अहो अंधार पडलाय. अंधारात कसं दिसणार तुम्हाला?"

"अंधार असा असतो? काळा काळा?"

"मग कसला असायचा? पांढरा सफेत?"

"बरी गंमत आहे हो तुमच्या गावात."

जावईबापूंना फारच गंमत वाटली. "आमच्या गावात नाही बुवा अंधार कधी पडत. चमत्कारिकच आहे गाव तुमचं! काही दिसत नाही म्हणजे मजाच झाली म्हणायची. हा: हा:!"

मेहुण्यांना वाटले, जावईबुवा फार विनोदी आहेत. मोठे गमतीदार बोलतात. त्यांनाही फार हसू आले. सगळे हसायला लागले तसे जावईबुवाही पुन्हा जोरजोरात हसायला लागले.

"का? कशी सांगितली तुमच्या गावातली गंमत? आं?"

"सांगितलीत खरी बुवा!"

"तुम्हाला माहीत नव्हती ना?"

"नव्हती खरी!"

"अस्सं!"

गप्पागोष्टींत वेळ गेला. बैठकीत दिवा टांगला होता. त्याचा उजेड सगळीकडे पडला होता. हा काय प्रकार आहे त्यांना कळेना. विचारावे वाटले, पण चार बाहेरची माणसे बैठकीत येऊन बसल्यामुळे स्वारी गप्प बसली. आठ-साडेआठ वाजले. पंगत वाढली. सगळेजण जेवायला उठले. जावईबुवा हातपाय धुवायला अंगणात गेले. पाहतात तो जिकडे तिकडे पणत्या ओळीने लावून ठेवलेल्या. ही कसली वस्तू आहे बुवा? दिसायला तर लहानशी दिसते. उजेड तर पडतो आहे. फारच मजेदार!

जावईबुवांनी मेहुण्यांना हाक मारली, विचारले,

"हे काय आहे हो?"

"कुठं काय?" मेहुण्यांना काही कळेना. शेवटी जावईबुवांनी हात दाखवला. पणतीतल्या ज्योतींनाही त्यांनी हात लावला. चटका बसल्याबरोबर त्यांनी झटकन हात मागे घेतला. 'ओय्!' करून मोठ्यांदा किंचाळले.

"हं हं, हे होय?"

"हां, हेच. बाप रे! चांगलं पोळतंय की. काय आहे हे?"

मेहुण्यांनाही थट्टा करायची लहर आली. ते म्हणाले,

"तुमच्याकडं उजेड असतो ना?"

"हां हां."

"तो कोण देतो?"

"वर आभाळात सूर्य म्हणून असतो. तो देतो. का बुवा?"

"मग आमच्याकडं अंधार असतो ना. म्हणून ही सूर्याची पिल्लं ठेवलेली आहेत आम्ही. छान उजेड पडतो."

सूर्याची पिल्लं? अरे वा! मोठीच मजा आहे म्हणायची. सूर्याला पिल्लं असतात हे आपल्याला आतापर्यंत कसे कळले नाही? अन् याच गावात ही पिल्लं नेमकी कशी आली? आपल्या गावात कशी नाहीत बुवा? आपल्या गावचं हवापाणी त्यांना मानवत नाही की काय? का त्यांना आपल्या गावचा पत्ताच माहीत नाही? असंच असेल बहुतेक. सूर्याची असली म्हणून काय झाले? पिल्लंच ती! बोलून चालून लहान. त्यांना एवढं कुठून माहीत असणार इतक्यात? ते काही नाही, ही पिल्लं सरळ उचलून आपल्या गावी नेली पाहिजेत. म्हणजे काय बहार होईल! अहाहा! जो तो विचारील की, सूर्याची पिल्लं तुम्हाला कुठं मिळाली? चैन आहे बुवा!... मग आपण अगदी ऐटीत सांगू की, खास सासुरवाडीहून आणली आहेत! हां...

जावईबापूंच्या मनात असे विचार एका क्षणात येऊन गेले. त्यांनी ठरवून टाकले की, ही सूर्याची पिल्लं घरी न्यायचीच. त्यांना चांगलं खाऊपिऊ घालून मोठी करायची. चांगली वाढली म्हणजे असा उजेड पडेल की वा! पण हे सासुरवाडीचे लोक चमत्कारिक आहेत. सरळ मागितली ही पिल्ले तर द्यायचे नाहीत. तेव्हा काहीतरी गुपचूप कारभारच केला पाहिजे. कुणाला काही सांगता उपयोगी नाही.

जावईबुवा मेहुण्यांना म्हणाले,

"वा वा! ही मोठी झकास चीज आहे बुवा! का हो, ही पिल्ले वाढतील का चांगली?"

मेहुणे मान हलवून चेष्टेने म्हणाले,

"का नाहीत वाढणार! पिल्लंच आहेत ती. चांगलीच वाढतील. मोठी होतील. मग त्यांना मिशा येतील..."

मिशा? सूर्याच्या पिल्लांना मिशा? जावईबुवा जोरजोरात हसू लागले. मेहुणेही हसत सुटले.

झाले. रात्रीचा जेवणाचा कार्यक्रम अगदी थाटात पार पडला. आग्रह करकरून जावईबुवांना सगळ्यांनी वाढले. इतके वाढले की, त्यांचे पोट पखालीसारखे तट्ट फुगले. त्यांना काही झोप येईना. या कुशीवरून त्या कुशीवर, त्या कुशीवरून या कुशीवर एकसारखे लागले लोळायला. चांगली रात्र झाली. सगळे झोपले. पुरुष झोपले. आवराआवर करून बायका झोपल्या. गडीमाणसं झोपली. पण जावईबुवांना काही झोप येईना. त्यांच्या डोक्यात ती सूर्याची पिल्लं एकसारखी गरगरत होती. मध्यरात्र होऊन सगळीकडं सामसूम झाली. जावईबुवांना वाटले, 'हां, ही बरी वेळ आहे. याचवेळी आपण संधी साधली पाहिजे. नाही तर पुन्हा असा मोका आपल्याला मिळणार नाही.'

स्वारी हळूच उठली. बघितले तर सगळ्या पणत्या तेल संपल्यामुळे विझून गेल्या होत्या. अंधारात काही दिसेना. नाही म्हणायला एक पणती मात्र जळत होती. कुणीतरी पुन्हा त्यात तेल घातले होते.

"बाकीची पिल्लं झोपली वाटतं?"–जावईबुवा मनात म्हणाले, "हे एवढं एकच पिल्लू जागं दिसतंय. एक तर एक! चला. तेवढंच उचलून ठेवू या लपवून. मग सावकाश नेऊ घरी. पण कुठं बरं लपवावं या पिल्लाला?"

जावईबुवांनी आपले रिकामे पोकळ डोके खाजवले. मग त्यांना एकदम एक जागा आठवली. त्यांनी हळूच ते सूर्याचे पिल्लू उचलले आणि नीट हातात धरून अंगणातली पलीकडची खोली गाठली. त्या खोलीत गवताची गंजी होती. कडबा वगैरे ठेवलेला होता. सकाळी याच खोलीत आपण बसलो होतो. जावईबुवांना आठवले. वा! काय छान जागा आहे! कुणी पाहणार नाही. थोडासा कडबा काढला जावईबुवांनी अन् दिले ते पिल्लू ठेवून आत न् काय! कुणाला दिसू नये म्हणून वर पुन्हा कडबा टाकला, अन् जी धूम ठोकली ती थेट अंथरुणावर. अंगावर पासोडी घेऊन स्वारी गुडूप झोपली. सगळा कारभार कसा अगदी गुपचूप!

पाच-दहा मिनिटांत इकडे गंजी धडधड पेटली. मोठी आग लागली. तास-दीड तासात

चांगलीच भडकली. सबंध खोली जळून खाक झाली. कुणीतरी तो प्रकार पाहिला आणि आरडाओरडा केला. सगळी माणसं दचकून जागी झाली. घाबरून इकडेतिकडे पळू लागली. गावातील माणसं गोळा झाली. या वेळपर्यंत घर पेटायची वेळ आली होती. जिकडेतिकडे ज्वाळा भडकल्या होत्या. लाल उजेड पसरला होता. पण गावातल्या माणसांनी, घरच्या लोकांनी शर्थ केली. पाण्याच्या बादल्यांवर बादल्या फेकल्या. तेव्हा कुठं आग आटोक्यात आली. हळूहळू आग विझली. लोकांना हायसे वाटले. सगळयांनी सुस्कारा सोडला. चला, जिवावरचे शेपटीवर निभावले. कशी लागली आग काही कळेना. सावकाराला त्रास देण्यासाठी कुणीतरी मुद्दाम आग लावली असली पाहिजे एवढे खरे. पाच-दहा हजारांचे तरी नुकसान झाले असावे.

थोडक्यात बचावले म्हणून घरातल्या सगळयांना बरे वाटले. नुकसान झाल्याबद्दल वाईटही वाटले. पण जावईबुवांना मात्र फारच वाईट वाटले. त्यांच्या डोळयांतून घळाघळा पाणी आले. रडतरडत ते मनाशी म्हणाले,

“माझं सूर्याचं पिल्लू फुकट जळून मेलं आत. कुणी मूर्खानं हा उद्योग केला कुणास ठाऊक!”

□

# वैद्याचा धंदा

दिवाळीच्या ऐन सणात जावईबुवा एकदम आजारी पडले. आजारी म्हणजे फार आजारी नाही, आपले किरकोळ दुखणे. ताप, पोट दुखणे असले काहीतरी. पण बुवाजी आजारी पडले एवढे खरे. सासूबाई मोठ्या हौशी होत्या. एकदा त्यांनी दुपारच्या खायच्या वेळेला मोठ्या हौसेने भजी केली. जावईबुवांना भजी इतकी आवडली की, काही विचारु नका. मागे 'नको, नको' म्हटल्यामुळे आपल्याला काकवी मिळाली नाही हे त्यांच्या लक्षात होते. म्हणून त्यांनी ठरवून टाकले की, बस्स! यापुढे विनाकारण 'नको नको' म्हणायचे नाही. समोर जिन्नस आला की, तो सरळ घ्यायचा आणि पोटभर खायचा. अगदी पोट नको नको म्हणू लागेल तेव्हाच थांबायचं. झाले, हा निश्चय करायला आणि सासूबाईंनी भजी करायला एकच गाठ पडली. ताट भरून भजी बाहेर आणलेली होती. ती एकट्या जावईबुवांनीच खलास केली. मेहुणे-मेहुण्या यांच्या वाट्याला एक तुकडा येऊ दिला नाही. त्यांच्यासाठी पुन्हा दुसरे ताट आले तेही जावईबुवांनीच फस्त केले. दुसऱ्या कुणाला हात लावू दिला नाही. जावईबुवांना एकूण भजी बरीच आवडतात हे पाहिले तेव्हा मेव्हण्यांनी थट्टा सुरू केली. उगीचच आग्रह चालवला. आणखी एक ताट आणले. तेव्हा मात्र जावईबुवा रागावले. या रागाच्या भरात त्यांनी तिसरेही ताट स्वच्छ रिकामे करून सगळयांच्या पुढे ठेवून दिले. दोन तांबे पाणी गटागटा पिऊन एक अशी मोठी ढेकर दिली की, जवळ बसलेली माणसे तर दचकलीच, पण अंगणात झोपी गेलेले कुत्रेही एकदम दचकून उठले आणि भुंकू लागले. जावईबुवांसकट सगळे हसू लागले. ते कुत्रेही थोडेसे हसल्यासारखे दिसले. एकूण मोठी मौज झाली.

पण रात्री मात्र चांगले उट्टे निघाले. जावईबुवांचे पोट दुखू लागले. त्यांना कसेसेच होऊ लागले. डोके, हातपाय, अंग ठणकू लागले. अंगात थोडा तापही चढला. शेवटी शेवटी पोट इतके दुखू लागले की, स्वारी गडबडा लोळू लागली. उलट्या आणि जुलाब यांनी हैराण झाली. बायकोने हातपाय रगडले. चाटण करून दिले. पोट शेकले. पण जावईबुवांची स्थिती सुधारेना. ते रात्रभर कण्हत कुंथत राहिले. ओरडू लागले.

घरात सकाळी सगळ्यांना जावईबुवांच्या आजारपणाची बातमी समजली. सासऱ्यांनी भराभरा वैद्यबुवांना बोलावणे पाठवले. म्हातारे वैद्यबुवा हातात बटवा घेऊन आले. त्यांनी मोठ्या गंभीरपणाने जावईबुवांची नाडी पाहिली. पोट तपासले. मग विचारले,

"काय, भजी खाल्लीत वाटतं काल?"

जावईबुवा चकित झाले. आपण काल भजी खाल्ली हे या राजेश्रींना कसे कळले? का मघाशी पोटावर हात दाबून पाहिला त्यावेळी आतली भजी त्यांच्या हाताला लागली? तसेच असावे. वैद्यबुवा मोठे हुशार दिसतात. साधा हात लावला तर त्यांना आतला पदार्थ कुठला हे बरोबर कळतं अं? वा वा!...

“काय भजीच ना?”

जावईबुवा तोंड वेडेवाकडे करीत बोलले,

“होय हो. भजीच! दुसरं काही खाल्लं नाही, देवाशपथ! अन् तीसुद्धा किती थोडीच खाल्ली. फक्त तीन ताटं! खोटं वाटत असेल तर विचारा.”

“खोटं कशाला बोलाल तुम्ही? फक्त तीन ताटं ना? आता आलं लक्षात माझ्या.” वैद्यबुवा बोलले.

“रात्रभर उलट्या अन् जुलाब. एकामागोमाग एक. चाललाय आपला दणक्या. तरी पोटातल्या पोटात किती जुलाब झाले असतील कुणाला ठाऊक?”

“पोटातल्या पोटातसुद्धा जुलाब झाले का?”

“तर काय? सारखे पोटातून गुरगुरगुर आवाज येत होते.”

“ठीक आहे. मी औषध देतो तेवढं प्या. म्हणजे सगळं खलास होईल. उलट्या, जुलाब, गुरगुर सगळं बंद.”

वैद्यबुवांनी बटवा उघडला. त्यातली एक मात्रा काढून त्यांनी सहाणेवर उगाळली. तिचे चाटण करून जावईबुवांना दिले. मग ते सासऱ्यांबरोबर गप्पा मारीत बाहेर बैठकीत बसले. अर्ध्या तासात जावईबुवांचे दुखणे एकदम पळाले. ताप उतरला. उलट्या, जुलाब बंद झाले. अंग दुखायचेही थांबले. जावईबुवांना एकदम हायसे वाटू लागले. त्यांनी गडबडीने वैद्यबुवांना हाक मारली. सगळे दुखणे खलास झाल्याचे सांगून टाकले.

“ते मला माहीतच होतं.” वैद्यबुवा म्हणाले. “म्हणून तर मी बाहेर बसलो घटकाभर. म्हटलं, तुम्हाला बरं वाटल्यावरच घरी जावं.”

“तुमच्या या औषधात मोठी जादू आहे बुवा.” जावईबुवा डोळे विस्फारून बोलले. “अर्ध्या तासात सगळं बंद. हा: हा:! भजी खायच्या आधीच तुमचं औषध घेतलं असतं तर फार मौज झाली असती, नाही? हा: हा:!”

“मग त्या भज्यांच्या पोटात दुखलं असतं. हा: हा:!”

वैद्यबुवाही जावईबुवांबरोबर हसू लागले. सगळेच हसू लागले. थोड्या वेळाने हशा कमी झाल्यावर जावईबापूंनी जिज्ञासेने विचारले,

“पण काय हो वैद्यबुवा, मी काल भजी खाल्ली होती, हे तुम्ही कसं काय ओळखलंत बुवा?”

जो माणूस सकाळी वैद्यांना बोलवायला गेला होता त्यानेच वैद्यबुवांना सगळे सांगितले होते. पण जावईबापूंचा प्रश्न ऐकल्यावर वैद्यांनाही जरा थट्टेची लहर आली. ते गंभीरपणाने म्हणाले,

“अहो, साधी गोष्ट आहे. हे ओळखायला काही फार अक्कल लागत नाही. सकाळी दारातून आत पाऊल टाकल्याबरोबर मी पाहिलं. मोलकरीण काल संध्याकाळची भांडी घाशीत होती. भज्यांची कढई, खरकटी ताटं, भज्यांचे लहानमोठे तुकडे मोरीपाशी पडलेले होते. त्याच्यावरून मी अंदाज केला झालं. आहे काय न् नाही काय!”

वैद्यबुवा निघून गेले. पण जावईबुवांच्या डोक्यात त्यांनी सांगितलेली गोष्ट पक्की रुतून बसली. आता आले लक्षात. वैद्यकी ही काही तितकीशी कठीण गोष्ट नाही दिसत! जरा आसपासचे पाहाचे अन् द्यायचे ठोकून. बरोबर कळते. मागाहून कुठली तरी एक कांडी उगाळून दिली म्हणजे झाले. रोगी खडखडीत बरा झालाच पाहिजे. किती सोपी गोष्ट आहे!

दिवसभर विश्रांती घेतल्यावर जावईबुवांना खूपच हुशारी वाटली. संध्याकाळी ते एकटेच बाहेर पडले आणि खूप लांब हिंडायला गेले. अंधार व्हायला लागला, तसे ते माघारी वळले. वाटेत एका गल्लीच्या तोंडाशी असलेल्या घरासमोर दहा-पंधरा माणसे घोळका करून उभी राहिलेली त्यांनी पाहिली. आतून रडण्याओरडण्याचा आवाजही ऐकू आला. तेव्हा जावईबुवा थबकले. त्यांनी कुणाला तरी विचारलं,

"काय झालं हो? कुणी मेलंबिलं काय?"

"अजून मेला नाही, पण मरेल लवकरच."

"आं?"

जावईबुवांनी चौकशी केली तेव्हा कळले की, या घरातला तरणाताठा पोरगा सकाळी एकाएकी बाहेरून आला आणि आईबापांनी काहीतरी विचारल्याबरोबर त्यांच्या अंगावर ओरडू लागला. शिव्या देऊ लागला. दुपारपासून तर तो सारखा बेशुद्ध पडतो आहे आणि उगीचच ओरडतो आहे. वैद्यबुवा आणले, मांत्रिक आणले; पण काही सुधारणा नाही. पोरगा सरळ काही बोलत नाही. सारखा अंगावर धावून तरी जातो, नाही तर शिव्या तरी देतो. मधूनमधून बेशुद्ध पडतो.

एवढी माहिती ऐकल्यावर जावईबुवांना एकदम अवसान आले. दोन्ही हाताच्या बाह्या सावरून ते म्हणाले,

"चला आत, बघू तर द्या मला एकदा रोगी. म्हणजे बरोबर रोग पळवून लावतो."

लोकांना वाटले, हा कुणीतरी धन्वंतरीच देवाने पाठवून दिला. भराभरा गर्दीतून वाट काढून त्यांनी जावईबुवांना घरात नेले. जावईबुवांनी ओसरीवर जाऊन रोग्याची नाडी पाहिली. पोट तपासण्याचा प्रयत्न केला. त्याबरोबर बेशुद्ध पडून असलेला रोगी एकदम उठला आणि शिव्या देऊ लागला. ओरडला.

"गप बैस गाढवा! मी पोट तपासतो आहे तुझं. एवढी अक्कल नाही का तुला?" असे म्हणून जावईबुवांनी जोराने त्याच्या मुस्कटात भडकावली. त्याबरोबर रोगी घाबरल्यासारखा दिसला. त्याने एकदम तोंड मिटले.

जावईबुवांनी पोट दाबदाबून पाहिले. पण आतल्या पदार्थाचा काही पत्ता लागला नाही. शेवटी ते उठले आणि ओसरीवर इकडेतिकडे पाहू लागले. कुठे काही नव्हते. ओसरीवरून अंगणात पाहिले. एका कोपऱ्यात थोडेसे शेण पडले होते. बाकी कुठे काही नव्हते.

जावईबुवांनी एक मिनिट डोके कराकरा खाजवले. मग ते मोठ्यांदा म्हणाले,

"आता आलं लक्षात, काल रात्री नक्की शेणं खाल्लंय यानं. म्हणून हा असा प्रकार चाललाय."

"शेण?" लोकांना आश्चर्य वाटले.

"होय, शेणच!" जावईबुवांनी ठासून सांगितलं. "तीन ताटं तरी कमीत कमी खाल्लं असेल."

गंमत अशी होती की, तो पोरगा वाईट मित्रांच्या नादाने बिघडला होता. आदल्या रात्रीच त्याने दारु पिऊन पाहिली होती. त्या धुंदीत एके ठिकाणी चोरी करून स्वारी सकाळीच घरी आली होती. दारुमुळे त्याचे डोके गरगरत होते. कुणीतरी आपल्याला पकडून नेईल अशी भीती वाटत होती. ते लपविण्यासाठी तो वेड्याचे सोंग करीत होता. जावईबुवांचे बोलणे ऐकून तो एकदम घाबरला. त्याला वाटले बाप रे, त्यांनी बरोबर ओळखले!...

पण तरी तोंडावर काही न दाखवता तो पुन्हा बेशुद्ध पडला. म्हणजे खोटेखोटे बरे का!

त्याचे आईवडील हात जोडून म्हणाले,

"महाराज, आता याला औषध?"

"हो, औषध आहे ना." जावईबुवांनी मान डोलवली.

"मग द्या महाराज. फार उपकार होतील."

जावईबुवांना आठवले. आपल्या वैद्यांनी काय केले होते बरे? पिशवीतून कांडी काढून उगाळून दिली होती, नाही का? आपल्याजवळ तर काही पिशवी नाही अन् कांडीही नाही. मग काय करावे? हां, इथेच कुठे घरात एखादी सापडते काय कांडी ते पाहावे. द्यावी उगाळून.

जावईबुवांनी इकडेतिकडे दृष्टी टाकली. कुठे काही नव्हते. एका कोनाड्यात तांबड्यालाल मिरच्या होत्या चारदोन. जावईबुवांनी एक छानशी लालभडक मिरची उचलली. सहाण घेऊन पाणी घातले. चांगली निम्मी मिरची उगाळली अन् एकदम त्या पोराच्या तोंडात कोंबली.

त्याबरोबर अशी आग झाली म्हणता! तो पोरगा एकदम किंचाळी मारून उठला आणि लागला ओरडायला,

"मेलो मेलोऽ, आग आग... आऽग... आई गंऽ..."

जावईबुवांनी गंभीरपणे विचारले,

"तुला आता बरं वाटतं का नाही? का आणखीन थोडं औषध देऊ?"

हा प्रश्न ऐकल्यावर तो पोरगा भयंकर घाबरला. त्याने एकदम जावईबापूंचे पायच धरले.

"चुकलो मी. आता पुन्हा असल्या वाईट गोष्टी कधी करणार नाही. दारु पिणार नाही. चोरी करणार नाही."

जावईबुवांना ही काय भानगड झाली हे कळले नाही. त्यांनी विचारले,

"झाला रोग खलास?"

"अगदी खलास!"

“शाबास!”

जावईबुवा उठले आणि निघाले. सगळयांनी त्यांची भरमसाठ स्तुती केली. असा वैद्य आपण जन्मात कधी पाहिला नाही, असे सगळेजण म्हणाले. बापाने त्यांच्या हातात पाच रुपये ठेवले. आईने पेढे आणून दिले. पेढे खात खात स्वारी घरी येऊन पोहोचली. घरी पोहोचेपर्यंत गावात सगळीकडे जावईबापूंच्या हुशारीची बातमी पसरली. सासुरवाडीला कळली. त्यामुळे जावईबापूंबद्दल सगळयांना भयंकर आदर वाटला. ज्याने त्याने त्यांची स्तुती केली. जावईबुवा मोठे खूश होऊन गेले. मनात म्हणाले,

“बस बस! आता परत घरी गेलो म्हणजे वैद्याचा धंदाच सुरू करायचा. खूप पैसे मिळवायचे. अन् खूप भजी खायची!...”

□

# डोक्याचे माप

दिवाळीच्या आधी एकदोन महिनेच सासरेबुवांनी गाय विकत घेतली होती. फार छान होती. लहानशी. तांबूस रंगाची. कपाळावर भस्मासारखा सुंदर पांढरा पट्टा. डौलदार, गोल वळलेली शिंगे. दूध भरपूर द्यायची आणि अगदी गरीब पुन्हा! अगदी लहान मूल जरी जवळ गेले तरी कधी कुणाला मारायची नाही.

आमच्या जावईबुवांना गाय फारच आवडली. बायको गाईला सरकी, पेंड घालीत होती त्यावेळी जावईबुवा चुकून गोठ्यात आले. त्यांनी ही गाय पाहिली. खाली मान करून ती पेंड खात होती. खाताना तिची अक्कडबाज शिंगे अशी अक्कडबाज हलत होती की, बायकोकडं पाहायचं विसरून जावईबुवा आपले गाईकडेच पाहात राहिले.

गाईची पोळी खाजवता खाजवता बायको म्हणाली,

"काय बघता एवढं टक लावून?"

जावईबुवा आनंदाने म्हणाले,

"काय गं सुंदर आहे गाय! अगदी तुझ्यापेक्षा सुंदर!"

"इश्श! काहीतरीच काय बोलता!" बायकोला हसू आलं.

"खरंच छान आहे दिसायला."

"नुसती दिसायला आहे असं नाही काही. दूधही खूप देते. एका वेळेला तीन तीन शेर."

"हो का? फार छान झालं! मग उद्यापासून – मी नुसतं दूध पीत जाईन. मला फार आवडतं गाईचं दूध. जेवणबिवण नकोच करायला."

"काहीतरीच काय बोलता? इतकं कुठं प्यायचं असतं वाटतं दूध?" बायको रागावून म्हणाली. "जरा सासुरवाडीला आहात याची आठवण ठेवा म्हटलं. लहान पोरासारखं काय करता?"

जावईबुवा खट्टू झाले.

"बरं, दूध नाही तर नाही. पण मी हिला रोज पेंड, सरकी घालीत जाईन."

"जावईमाणसानं सासुरवाडीला अशी कामं केलेली बरी दिसत नाहीत हं–" बायकोने समजावून सांगण्याचा प्रयत्न केला. पण जावईबुवा काही ऐकेनात. शेवटी बायकोने ते कबूल केले. मग तेव्हापासून तेच रोज सरकीची, शेंगदाण्याची पेंड, करडीची पेंड गाईला घालू लागले. मधूनमधून पेंडीचे खमंग तुकडे तोंडातही टाकू लागले.

मग दोनतीन दिवसांनी फार गंमत झाली!

जावईबुवा पेंडीचा तुकडा तोंडात चघळत गोठ्यात नेहमीप्रमाणे उभे होते. खाली ठेवलेल्या ताटात तोंड घालून गाय पेंड-सरकी खात होती. मान सारखी हलत असल्यामुळे तिची डौलदार, गोल शिंगेही हलत होती. गळ्यातल्या चंगाळ्या वाजत होत्या. जावईबुवा

तिच्याकडे पाहात उगीच उभे होते.

पाहतापाहता त्यांचे लक्ष एकदम तिच्या शिंगांकडे गेले. ओहो! काय मजा आहे. हे आपल्या आधीच कसे लक्षात आले नाही?

गाईची शिंगे अगदी गोल आकारात आत वळली आहेत. दोन्ही टोके अगदी एका रेषेत जवळजवळ आली आहेत. लांबून पाहिले तर एक अगदी छान वर्तुळच असल्यासारखे दिसते की!...

शिंगांच्या त्या वर्तुळाकडे पाहता-पाहता जावईबुवांना वाटले, किती बरोबर आहे हे वर्तुळ! काय बरं अंतर असेल मधले? आपल्या डोक्याएवढे? आपले डोके त्यातून आरपार जाईल की नाही?

जावईबुवांनी तीक्ष्ण नजरेने एकदा त्या शिंगांकडे पाहिले. त्यांना हात लावून पाहिला. एकदा वाटले, जाईल की डोके त्यातून. आहे काय त्यात विशेष! पुन्हा वाटले, नाही, नाही जायचे बुवा. जरा लहानच दिसतंय. पुन्हा वाटले, जाईल जाईल...

त्या दिवसभर जावईबुवांना दुसरे काही सुचलेच नाही. डोक्यात सारखा हाच विचार. ‘डोके शिंगातून जाईल की नाही?’ कधी वाटायचे जाईल, कधी वाटायचे, नाही जायचे मुळीच. रात्रभर त्यांना झोप आली नाही. पहाटे त्यांना झोप लागली. तेव्हा त्यांना स्वप्नातसुद्धा सारखे शिंगांचे वर्तुळच दिसत होते.

सकाळी नेहमीप्रमाणे उठून ते गोठ्यात गेले तेव्हा त्यांचे डोके विचार करून करून पिकून गेले होते. नेहमीप्रमाणे अंबोणाची पाटी गाईसमोर ठेवून ते उभे राहिले. तेव्हा पुन्हा ते वर्तुळ हलायला लागले आणि एकसारखे त्यांचे लक्ष तिकडे जायला लागले. काय बुवा गंमत आहे! डोके जाईल की नाही यातनं? काय वाटतं? जाईल ना बहुतेक? हो, जाईलच. जाईल? छे छे! मुळीच जाणार नाही. असं कसं होईल? एवढं मोठं आपलं डोकं त्यातून कसं जाईल?

विचार करून जावईबुवा त्रासले. त्यांनी दोन्ही हात डोक्याला लावले. अंदाजे माप घेतले. मग तेच हात अंतर तसेच कायम ठेवून शिंगांना लावून बघितले. अगदी बरोबर माप असल्यासारखे वाटले. मग नक्की काय? डोके यातून जाईल की नाही? जाईल बहुतेक; पण माप अगदी बेताने बरोबर आहे. बहुतेक नाही जायचे डोके, असे कसे जाईल ते?

विचार करकरून स्वारी रडकुंडीला आली, पण नक्की काही उत्तर मिळेना अन् डोक्यातले किडे काही जाईनात. शेवटी एकदम त्यांच्या डोक्यात उजेड पडला. इतका विचार कशाला पाहिजे? साधी गोष्ट आहे. आपले डोके घालूनच पाहू ना त्यात. गेले आरपार तर जाईल म्हणून समजायचे, नाही गेले तर नाही जाणार म्हणून समजायचे! अगदी सोपी आणि साधी गोष्ट. इतका वेळ आपल्या लक्षात कसे आले नाही?

जावईबुवांनी हळूच कानोसा घेतला. इकडेतिकडे पाहिले. कुणी जवळपास नव्हते. मग स्वारी गाईजवळ जाऊन हळूच उभी राहिली. दोन्ही हातांनी तिची शिंगे धरली. चांगली घट्ट धरली आणि आपले डोके घातले मधे. लागले पलीकडे ढकलायला.

त्याबरोबर गाय अशी बिथरली म्हणता! हा बुवा असा काय करतोय हे तिला कळेना.

एकदादोनदा तिने शिंगे इकडेतिकडे हलवून पाहिली. शेपटी मारून पाहिली. मुस्कट जोरजोरात हलवले. पण जावईबुवा कसले खट. ते काही शिंगे सोडीनात आणि सोडायचे म्हटले तरी त्यांना आता शक्य नव्हते. कारण त्यांचे डोके अर्धवट आत गेले होते आणि अडकून बसले होते. ते धड पुढेही सरकेना आणि परत मागेही येईना. चांगले बसले अडकून!

मग मात्र गाय अशी चवताळली की बास! तिने गोठ्यात नुसता धुमाकूळ घातला. एकसारखी ती भिंतीला धडक देऊ लागली. मुस्कट जोरजोरात फिरवायला लागली. जावईबुवांचे डोके धडाधड भिंतीला आदळू लागले. आपटून आपटून त्यांच्या डोक्याला खोक पडली. रक्त यायला लागले. दोन-तीन ठिकाणी चांगली टेंगळे आली.

दहापंधरा मिनिटे असा गोंधळ चालला. अगदी असह्य झाले तेव्हा जावईबुवा मोठ्यांदा ओरडले,

"अगं आई गंऽ, मेलो मेलो...!"

गोठ्यात काहीतरी धडधड चालू आहे हे घरात सगळीकडेच ऐकू गेलं होतं. पण असेल काहीतरी म्हणून कुणी विशेष लक्ष दिले नव्हते. पण जावईबुवांच्या ओरडण्याचा आवाज आल्यावर मात्र सगळेच धावले. सासरेबुवा, सासूबाई, मेहुणे, बायको, गडीमाणसे; सगळी माणसे पळत गोठ्याकडे आली. बघतात तो जावईबुवांचे डोके गाईच्या शिंगांत अडकलेले! गाय जोरजोरात भिंतीला धडक देत आहे आणि जावईबुवा अर्धवट गाईच्या अंगावर पडून इकडेतिकडे फरफटताहेत आणि डोक्याला दणका बसला की ओरडताहेत-"मेलो, मेलोऽ, आई गं..."

सगळी माणसं घाईघाईनं पुढं धावली. काहीजणांनी गाईला चुचकारून थांबवले. एकदोघांनी जावईबुवांना पकडून ठेवले. कुणी त्यांची कंबर धरली, कुणी त्यांचे पाय, मग जोरात पाठीमागे ओढले तरी त्यांचे अडकलेले डोके पाठीमागे येईना. मग आणखी एकदोघांनी जावईबुवांचा पहिल्याने देह धरला. पुन्हा नेट लावला. चांगभले! म्हणून एकदम त्यांनी पाठीमागे ओढले. त्याबरोबर डोके एकदम शिंगांतून निसटले आणि ताण हलका झाल्यामुळे सगळी माणसे मागच्या मागे धपाधप कोसळली! त्यांच्या अंगावर जावईबुवा दाणकन आदळले. सगळयांनाच थोडाथोडा खालचा शेणाचा, घाणीचा प्रसाद मिळाला.

हळूहळू सगळी मंडळी उठली. जावईबुवांना घरात नेण्यात आले. त्यांच्या कपाळावरच्या जखमेत हळद-चुना भरला. पट्टी बांधली.

थोडे स्थिरस्थावर झाल्यावर मेहुणे म्हणाले,

"काय जावईबुवा, काय झालं असं हे? तुमचं डोकं शिंगांत अडकलं कसं?"

जावईबुवा दूध पितापिता ऐटीत म्हणाले,

"अडकलं नाही. मीच ते आत मुद्दाम घातलं होतं."

"आं! मुद्दाम?" सगळी मंडळी सर्द झाली!

"होय."

"ते कशाला?"

“मला पाहायचं होतं, आपल्या डोक्याचं माप आणि त्या शिंगांतलं अंतर सारखंच आहे का नाही ते. त्यातून डोकं पलीकडे जाईल की नाही, अशी शंका सारखी येत होती.”

सगळेजण आश्चर्यचकित झाले. जावईबुवांच्या या विद्वत्तापूर्ण बोलण्यापुढे काय बोलायचे?

थोड्या वेळाने सासरे म्हणाले,

“अहो, पण एवढ्याशा गोष्टीसाठी किती त्रास हा! सगळ्या अंगावर ओरखडे, मुका मार. डोकं तर आपटून आपटून चेमटल्यासारखे दिसतंय तुमचं. खोक पडली शिवाय एवढी मोठी–”

“हं:!–” जावईबुवांनी नाक उडवले, “त्यात विशेष नाही. हे काय, होईल बरं ताबडतोब. पण आता डोक्यात पुन्हा विचार नाही येणार तो. कसं हलकं हलकं वाटतंय. एकदा कळलं तरी मला–”

“काय?”

“आपल्या डोक्याचं माप अन् तुमच्या गाईच्या दोन शिंगांमधलं अंतर अगदी बरोबर आहे! एका केसाचा फरक नाही. हा: हा:! फार मोठा शोध लागला आज मला.”

□

# भुताशी झटापट

नरक-चतुर्दशीच्या दिवशी फार गंमत झाली. दिवस सगळा मजेत गेला. रात्रीची जेवणीखाणी झाली. पुरुषमंडळी बाहेर अंगणात सतरंजी टाकून बसली. सासरे, मेहुणे, गावातील चारदोन मंडळी. जावईबुवाही या घोळक्यात होतेच. सासुरवाडीला त्यांना इतक्या लवकर कोण झोपू देणार? बसायला त्यांना खास गादी दिली होती. पाठीमागे तक्क्या पालथा टाकला होता. तक्क्यावर कोपर टेकून ते पेंगत होते. मधेच कुणीतरी त्यांना हलवून जागे करी–

"जावईबुवा, जागे आहात ना?"

"वा!... अगदी अखंड जागा आहे."

"मग सांगा बरं. आम्ही आता काय बोलत होतो?"

कुणीतरी रात्रीची वेळ, अंधार असे काही बोलत होते. त्यातला 'अंधार' शब्द त्यांनी अर्धवट ऐकला होता. प्रश्न ऐकल्याबरोबर ते बोलले.

"धार ना?... हो हो, आमच्या इकडं शेतातल्या विळयाकोयत्यांना चांगली धार असते. सपासप कापतात–"

"असं?" सगळी मंडळी हसू लागली.

"तर!... पूर्वी तलवारींनासुद्धा धार असे असं मी ऐकलंय. रक्तसुद्धा निघत असे म्हणे."

हे ऐकल्यावर तर जमलेली मंडळी आणखीनच हसू लागली. जावईबुवा फार विनोदी आहेत असा मेव्हण्यांना संशय आलाच होता. तो आणखीन पक्का झाला. ते तर खो खो करून मोठ्यांदा हसू लागले.

आता मात्र जावईबुवांची झोप उडाली.

जरा सावरून बसून डोळे चोळीत ते म्हणाले,

"का– हसायला काय झालं? कुणी पडलं बिडलं की काय धबेल करून?"

"अहो, तसं नाही–" मेव्हणे पुन्हा तोंड पसरून हसले.

"मग?"

जावईबुवांनी आश्चर्याने विचारले. मग त्यांना हळूहळू कळले की, भुताखेतांच्या गप्पा चालल्या आहेत. रात्र हा प्रकारच कधी पाहिलेला नसल्यामुळे भुतेखेतेही त्यांच्या परिचयाची नव्हती. आज त्यांना नवीनच माहिती कळली. एखादे माणूस मेले म्हणजे भूत होते. हे भूत रात्रीच्या अंधारात हिंडत असते. अनेक ठिकाणी ते झाडावर बसलेले असते. कधी-कधी ते पडक्या विहिरीत असते किंवा एखाद्या ओसाड वाड्यात राहते. त्याचे पाय उलटे असतात. पाणी ओलांडून ते पलीकडे कधी जात नाही. माणसाची त्याची भेट झाली ना, तर ते माणसाला चांगलेच घोळसते. म्हणून शहाण्या माणसाने कधी भुताच्या वाटेला

जाऊ नये.

ही माहिती जावईबापूंना अगदी नवीनच होती. ऐकता ऐकता त्यांनी तोंडाचा आ वासला. डोळे विस्फारले.

"भूत झाडावरच का असतं बुवा? अन् रहायचंच तर पडक्या वाड्यात काय म्हणून? चांगल्या वाड्यात का नाही रहात?"

सासरे बोलले–

"त्याची पद्धतच तशी. दुसऱ्या जागा आवडतच नाहीत त्याला. आपण तरी काय करणार?"

"हो हो, तेही खरंच म्हणा- अन् माणसाला धरतं ते काय म्हणून?"

"त्यांच्या हद्दीत गेलं की धरतं ते."

"मग दन्नादन्नी करायची. चांगलं बदडून काढायचं अन् आपण पळून जायचं."

"छे: छे:! ते इतकं सोपं नाही." एक गावकरी म्हणाला.

"का नाही सोपं? मी करून दाखवतो. मला दाखवा भूत तुमचं, नाकाडावर गुद्दाच हाणतो एक. घुणा फुटून चांगलं रक्त आलं पाहिजे–"

गप्पागोष्टी वाढतावाढता जावईबापू हट्टालाच पेटले! 'भूत तुमचं दाखवाच एखादं, नाही त्याचं टाळकं फोडलं तर बघा–' असे जोरजोरात सांगू लागले. सासरे, मेहुणे यांनी विषय बदलण्याचा प्रयत्न केला. पण जावईबुवा ऐकेचनात. मग गावातून आलेली मंडळीही हट्टाला पेटली. एकजण म्हणाला–

"जावईबुवा, उद्या आहे अमावस्या."

"असू द्या."

"अमावस्या हा तर भुतांचा वार. हमखास भुतं भेटतात. जाता का तुम्ही?"

"दोन पायांवर तयार–" जावईबुवा बोलले. "कुठं जायचं बोला."

"गावाच्या बाहेर एक पिंपळाचं झाड आहे. तिथं एक भूत आहे. अमावस्येला तर तिकडं कुणी जात नाही. जाता तुम्ही?"

"पठ्ठ्या तयार आहे. सांगितलं ना मघाशीच–"

"पण तुम्ही जाऊन आलात ते कशावरनं खरं मानायचं आम्ही?"

"भुताला विचारा ना दुसऱ्या दिवशी. हो म्हणतंय का नाही बघा–"

सगळी मंडळी जोरजोरात हसू लागली. जावईबुवा आश्चर्याने सगळयांकडे पाहू लागले. यात हसण्यासारखे काय आहे बुवा! चक्रमच आहेत लेकाचे.

"असं करा जावईबुवा तुम्ही–"

"कसं?"

"आम्ही एक खुंटा देतो तुमच्याजवळ तिकडं जाताना–"

"त्या भुताचं टाळकं शेकायचं ना त्या खुंट्यानं? कबूल! नक्की बदडतो. दुसऱ्या दिवशी

डोक्याला फडकं लावून हिंडतंय का नाही ते भूत बघाच तुम्ही" मंडळी पुन्हा खो खो करून एकसारखी का हसत राहिली आहेत ते काही जावईबापूंना कळेना.

"तसलं काही करू नका. खुंटा हातात धरायचा अन् गावाबाहेरच्या त्या पिंपळाखाली जायचं. तिथं दिवसाउजेडीच आम्ही दगड ठेवू, त्या दगडानं तो खुंटा जमिनीत पक्का ठोकायचा."

"अन् पुढं?"

"पुढं काय! निघून यायचे. दुसऱ्या दिवशी दिसला आम्हाला खुंटा ठोकलेला तिथं तर आम्ही म्हणू– 'भले शाबास!'

"ठरलं."

"बघा हं?"

"तुम्ही बघाच. ठरलं म्हणजे ठरलं."

बोलता बोलता हे सगळे उठले, की अमावस्येच्या दिवशी रात्री बारा वाजता जावईबुवांनी खुंटा हातात घेऊन एकटे गावाबाहेर पडायचे आणि पिंपळाच्या झाडाखाली खुंटा ठोकून परत यायचे. जावईबापूंनी ती गोष्ट ताबडतोब कबूल करून टाकली. मंडळी हळूहळू पांगली. सासरेबुवा आणि मेव्हणे यांनी खूप समजूत घालण्याचा प्रयत्न केला. पण गडी अजिबात ऐकायला तयार नाही असे दिसले; तेव्हा त्यांनीही नाद सोडून दिला. काय व्हायचे असेल ते होईल. आपण तरी या हट्टी माणसाला किती समजावून सांगणार?

दुसरा दिवस अमावस्येचाच होता. घरात दिवाळी चालूच होती. मिष्टान्न खाऊन संतुष्ट झालेले जावईबुवा आज विशेष खुशीत होते. आज रात्री मजा आहे. कसले भूत न् काय! उगीचच घाबरतात लेकाचे. बरोबर रात्री बारा वाजता जातो, त्या पिंपळाच्या झाडाखाली खुंटा ठोकतो आणि रुबाबात परत येतो.

दिवस सगळा मजेत गेला. गप्पागोष्टी, दिवाळीचा फराळ, दुपारचे मिष्टान्न. नंतरची सुस्ती. बघता-बघता अंधार झाला. जावईबुवा वाट बघत बसून राहिले.

मेहुणे म्हणाले,

"कसले येताहेत हो ते लोक? नुसत्या गप्पा त्या. तुम्ही झोपा जावईबुवा. तुमच्या धाडसीपणाची खात्री पटलीय सगळयांना."

कधी नव्हे ते घरची मंडळी जावईबुवांना लौकर झोपी जाण्याचा आग्रह करू लागली. बायकोही रागावली. रुसली. पण जावईबुवा काही ऐकायला तयार होईना.

मध्यरात्र होत आली. गावकरी मंडळी खरोखरच घोळका करून आली. एकाने एक चांगला लाकडी खुंटा आणला होता. तो जावईबुवांच्या हातात दिला.

"चला आमच्याबरोबर. आम्ही लांबून त्या झाडाच्या खाणाखुणा सांगतो. तिथं जायचं, खुंटा ठोकायचा अन् यायचं परत. बघू तुमची हिंमत..."

जावईबुवा निघाले. सगळयांचे काळीज धाडधाड उडत होते. बायको तर रडायच्याच बेताला आली होती. पण जावईबापूंना त्याची फिकीर नव्हती. हातात तो खुंटा घेऊन ते

रुबाबात निघाले.

सगळी मंडळी गावाबाहेरच्या वेशीपाशी येऊन पोहोचली.

अमावस्येची काळोखी रात्र. हवेत किंचित गारठाही होता. डोळ्यांत बोट घातले तरी नीटसे दिसत नव्हते इतका अंधार. बरोबर आलेली माणसेही मनातून घाबरली होती.

एकाने चंद्रज्योती पेटवली. तिच्या उजेडात लांबवरचे पिंपळाचे झाड जावईबापूंना दाखवीत तो म्हणाला,

"ते दिसतंय ना झाड? तेच ते. तिथं जायचं. हा खुंटा ठोकायचा अन् परत यायचं."

"अगदी मामुली गोष्ट आहे."

"मग सुटा."

तशा अंधारात जावईबापू निघाले. तो दाट काळोख, तो गारठा याची त्यांना मजाच वाटली. तशा अंधारातही गार वारा तोंडावर घेत ते चालले. रस्त्यावरची झाडे सळसळत होती. किर्रर्र आवाज एकसारखा चालू होता. ती सगळी गंमत पाहात जावईबुवा झपाझप चालत पिंपळाच्या झाडापर्यंत येऊन पोहोचले.

सगळीकडे अगदी शांत होते. आसपास एकही माणूस नव्हता. झाडांच्या फांद्यांतून वाऱ्याचा झोत गेला की फांद्या सळसळत. त्याचा एक विचित्र आवाज होई. नाही म्हटलं तरी जावईबापूंनाही थोडी भीती वाटली. चट्दिशी खुंटा मारावा आणि इथून निघावे, असा विचार त्यांच्या मनात आला.

चट्दिशी ते खाली बसले. आसपासची भुई हातांनी चाचपडून पाहिली. एक मोठा दगड हाताशी लागला. जावईबापूंनी खुंटा समोर रोवला. मग दगड उचलून त्याच्या पसरट टाळक्यावर हाणला. एक... दोन... तीन... चार. चांगले सात-आठ वेळा ठोकले. खुंटा भुईत चांगला रुतला. हलवून बळकट आहे की नाही ते त्यांनी पाहिले. मग सुटकेचा नि:श्वास सोडून ऐटीत बोलले–

"ए भुता, कुठं आहेस लेका तू? ये ना मला धरायला. बघू तुझी हिंमत..."

दोन मिनिटे वाट बघितली. कुणी आले नाही, गेले नाही. "हात् लेका–" असे म्हणून जावईबुवा उठले. उठले कसले, उठायचा प्रयत्न केला. पण त्यांना उठताच येईना. कुणीतरी त्यांचे धोतर धरून खस्कन ओढले. ते एकदम घाबरले. खाली बसल्यावर पुन्हा शांत. पुन्हा उठू लागले तसे पुन्हा त्यांचे धोतर कुणीतरी एकदम ओढले.

हा प्रकार दोनतीनदा झाला. मग मात्र जावईबुवा हबकले.

बाप रे!...

म्हणजे खरोखरच भूत आले आहे की काय? हे धोतर धरून कोण ओढते आहे? उठायचा प्रयत्न केला की धोतर ओढून कुणीतरी आपल्याला खाली बसवीत आहे हे नक्की. आपण इथून हलता कामा नये अशी इच्छा दिसते. खात्रीने हे भुताचेच काम.

जावईबापू एकदम किंचाळले– "मेलो... मेलोऽ..."

मग एकदम त्यांची दातखीळच बसली. चेहरा पांढराफटक पडला. काय वाटेल ते करून

इथून धूम ठोकली पाहिजे. शिर सलामत तर भुते पचास...

असा विचार करून जावईबुवा एकदम उठले. धोतर कुणीतरी पुन्हा ओढले. पण त्याची पर्वा न करता त्यांनी रस्त्याच्या दिशेने धूम ठोकली. धोतर जास्तच खेचले गेले. पण तरी त्यांनी मुसंडी मारली. शेवटी धोतर टरटर करीत फाटले आणि निसटले. नुसत्या आतील लंगोटानिशी जावईबापू धूम पळत सुटले. गावाच्या दिशेने वाऱ्यासारखे पळाले.

“बाप रे!... भूत... भूत!”

वेशीपाशी मंडळी धडधडत्या अंत:करणाने वाट पाहातच होते. जावईबापूंची किंकाळी ऐकू आल्याबरोबर सगळयांची पळापळ झाली. ज्याने त्याने आपापले घर गाठले.

घामाने डबडबलेले लंगोटबंद जावईबुवा पळत आले ते थेट वेशीपर्यंत. तेथे त्यांना कोणी दिसले नाही. मग ते तसेच सुटले ते थेट सासुरवाडी येईपर्यंत. मागे वळून काही त्यांनी पाहिले नाही.

वर सदरा, कोट-टोपी आणि खाली नुसता लंगोट असे जावईबुवा घरात शिरल्यावर घरातल्या सगळया मंडळींचीही पळापळ झाली.

नवे धोतर नेसून गुबगुबीत गादीवर पडल्यावर जावईबापूंना हुडहुडीच भरली. तशाही स्थितीत त्यांनी एकूण प्रकार सगळयांना सांगितला. भूत जावईबुवांचे प्रत्यक्ष धोतर ओढीत होते हे ऐकून सगळयांच्याच अंगावर काटा आला.

सकाळ झाली.

मग गावकऱ्यांपैकी एकजण त्यांचे फाटके धोतर घेऊन आला. म्हणाला,

“वा! जावईबापू! कमाल आहे तुमच्या धाडसीपणाची. खुंटा बरोबर ठोकलात. थोडं चुकलं–”

“काय झालं?” मेव्हण्यांनी विचारले.

“अहो हे भुईवर खुंटा मारायला खाली बसले. धोतराचा घोळ पुढं पडला असेल. त्या धोतरावरनंच त्यांनी खुंटा मारला. धोतर अडकलं खुंट्यात, दुसरं काय? सकाळी आम्ही तिथं गेल्यावर आम्हाला कळलं हे.”

खरा प्रकार कळल्यावर सगळी मंडळी पोट धरधरून हसू लागली. जावईबुवाही हसू लागले. हसताहसता ते म्हणाले,

“ते भूत सालं धोतर नेसणारं नसलं पाहिजे!... मी सांगतो ना. खुंट्यात धोतर अडकलं तरी लेकाच्याला कळलं नाही. हा: हा:!...”

❑

# ताप उतरला

ऐन दिवाळीत आणखी एक गंमत घडली. खाण्यापिण्यात काहीतरी बिघडले आणि जावईबुवांचे थोरले मेव्हणे एकाएकी आजारी पडले. सडकून ताप भरला. इतका की अंगाला हात लावला की चटका बसायचा. ताप एकाएकी एवढा वाढला हे बघून सगळे घाबरून गेले. सासऱ्यांनी नेहमीच्या वैद्यबुवांना बोलावणे धाडले. वैद्यमहाराजही टाकोटाक आले. त्यांनी रोग्याची नाडी तपासली. जीभ पाहिली आणि काळजी करण्याचे काही कारण नाही म्हणून सांगितले. बटव्यातून कसल्यातरी गोळ्या काढून दिल्या.

सासरे म्हणाले,

"पण ताप फार आहे अंगात. अगदी हात लाववत नाही. तो उतरेल असा काहीतरी उपाय करा."

वैद्यबुवा मान हलवून बोलले,

"औषध पोटातून घेतले म्हणजे उतरेलच ताप. पण तोपर्यंत गार पाण्याच्या पट्ट्या ठेवा कपाळावर. वाटल्यास काळी माती ठेवा म्हणजे कमी होईल ताप."

जावईबुवा जवळच बसले होते. त्यांनी आश्चर्याने विचारले,

"असं!... पाण्याची पट्टी कपाळावर ठेवली की जाईल ताप?"

वैद्यबुवांनी मान डोलावली.

"जाईल म्हणजे काय, गेलाच पाहिजे."

"शाबास! मजाच आहे तापाची मग. असं कसं होतं वैद्यबुवा?"

"त्यात व्हायचंय काय? अंगात ताप असतो. ताप म्हणजे काय?"

"काय?"

"उष्णता."

"अरेच्या!" जावईबुवांना आश्चर्य वाटले. ताप म्हणजे उष्णता काय? हे नव्हते माहीत. बरे झाले कळाले एकदाचे.

"गार पाण्याची पट्टी कपाळावर ठेवली म्हणजे ही उष्णता शोषून घेते–"

"कोण?"

"पट्टी. दुसरं कोण? मी?" वैद्यबुवा त्रासले.

"अरेच्या! पट्टी उष्णता शोषून घेते काय? मजाच आहे म्हणायची. मग पुढं काय होतं?"

"पुढं काय व्हायचंय कपाळ? ताप उतरतो."

"पण कपाळावरच पट्टी का ठेवायची?"

"मग कुठं ठेवायची?"

“समजा नाकावर ठेवली तर?”

“मग फक्त नाकावरचा ताप उतरतो, समजलं?” वैद्यबुवांनी आपला बटवा बंद केला, ते उठले आणि जायला निघाले. जावईबुवांचे अजून नीटसे समाधान झाले नव्हते. तेही उठले आणि त्यांच्या पाठोपाठ गेले. त्यांना अजून काही गोष्टी चांगल्याशा समजल्या नव्हत्या. पट्टी उष्णता शोषून घेते की, उष्णता पट्टीला शोषून घेते. अन् पट्टी म्हणजे कापड की त्यातलं पाणी? पट्टी ठेवल्यामुळे ताप कसा जातो?

वैद्यबुवांच्या पाठोपाठ जाऊन त्यांनी पुन्हा हे प्रश्न विचारायला सुरुवात केली. वैद्यबुवा कंटाळून गेले. ते म्हणाले,

“अहो जावईबापू, तुम्ही कधी तवा बघितलाय का, तवा?”

“तवा? आपल्या स्वयंपाकातला? हो.” जावईबापूंनी मान डोलावली.

“स्वैपाक संपल्यावर बायका काय करतात माहीत आहे?”

“जेवतात.”

“ते नाही म्हणत हो मी. तवा तापलेला असतो. त्याच्यावर थोडं गार पाणी टाकतात अन् मग घासायला टाकून देतात. का? तर गार पाणी टाकले म्हणजे तवा निवतो. तसंच आहे हे. गार पाण्याची पट्टी ठेवली की, ताप कमी होतो. सारखी पट्टी ठेवली की, उतरतो ताप. साधी गोष्ट आहे. आहे काय नि नाही काय?”

वैद्यबुवा निघून गेले. जावईबुवांच्या डोक्यात चक्क प्रकाश पडला. अरे लेकांनो, अशी गंमत आहे काय? गार पाण्याने ताप कमी होतो काय? वा, ही तर अगदी साधी गोष्ट आहे. आता कुठे ताप दिसला की, ही युक्ती बरी आहे.

जावईबापूंच्या रिकाम्या डोक्यात ही युक्ती कशी बरोबर जाऊन बसली. अगदी रुतूनच बसली म्हणानात.

दुपारची वेळ होती. मेव्हण्याचा ताप आता बराच उतरला होता. त्यामुळे सगळयांची काळजी नाहीशी झाली होती. जो तो स्वस्थपणे झोपला होता. सगळीकडे निवांत होते. जावईबुवा झोपले होते. थोड्या वेळाने त्यांची झोप पुरी झाली. ते उठून बसले. चूळ भरण्यासाठी म्हणून ते वाड्याच्या मागच्या भागात गेले.

वाड्याच्या मागच्या भागात लहान-लहान खोल्या होत्या. या खोल्या सावकारांनी आपल्या गड्यामाणसांना राहायला दिल्या होत्या. जावईबुवा दिसल्याबरोबर एक गडी आपल्या घरातून बाहेर आला. जावईबुवांना रामराम घालून म्हणाला,

“दादा, गरिबाचं एक काम हाय. करताल का?”

“कसलं काम?” जावईबुवांनी चौकशी केली.

“पोरगं फणफणलंय कालपासनं. लई जाळ हाय अंगात. दवाबिवा दिला तर लई उपकार हुतील बघा. हातसुदिक लावायला भ्या वाटतंय.”

“अंगात जाळ आहे?”

“व्हय महाराज!”

“शाबास! आधी सांगायचं नाहीस का मग? घर पेटेल ना तुझं?” जावईबुवांना भयंकर आश्चर्य वाटले. माणसाच्या अंगातून जाळ निघायला लागला म्हणजे आता कठीण काम झाले?

“बरं बरं, चल.”

घरात जाऊन जावईबुवांनी पाहिले. त्यांना जाळ वगैरे कुठे दिसला नाही. पोरगा मात्र अंथरुणावर पडून होता. सात-आठ वर्षांचा असावा. तापामुळे एकसारखा कण्हत होता.

“कुठाय रे जाळ अन् धूर? काहीतरीच खोटं सांगायचं म्हणजे काय?” असे म्हणून त्यांनी पोराच्या अंगाला हात लावला. चांगलाच चटका बसला हाताला.

“अरे, ताप आहे अंगात ताप. जाळ काय म्हणतोस वेड्यासारखं?”

“मग कसं करावं? काई दवापानी”

“औषध?”

“हां हां.”

“अगदी सोपं औषध आहे. गार पाण्याची पट्टी” बोलता बोलता जावईबुवांच्या डोक्यात एकदम एक कल्पना विजेसारखी चमकली. छे: छे:! पट्टी नकोच. पट्टीने ताप उतरायला बराच वेळ लागतो. ताप झटक्यात उतरेल असा काहीतरी उपाय शोधला पाहिजे

“चिंधी म्हणता व्हय? ती बी घरात न्हाई. थांबा. आणतो भायेरनं.” असं बोलून मुलाचा बाप घाईघाईने बाहेर निघून गेला. जावईबुवांचे डोके इकडे एखाद्या यंत्रासारखे गरगर फिरू लागले. आपल्याला सुचलेली युक्ती ताबडतोब करून बघितलीच पाहिजे. ताप झटक्यात उतरेल. अगदी तोळाभरसुद्धा राहणार नाही अंगात. मग या गजाला किती मजा वाटेल!

जावईबुवांनी घाईघाईने मनाशी बेत पक्का केला. त्यांनी आजारी मुलाच्या अंगावरचे पांघरूण काढले, कपडे काढले आणि त्याला खांद्यावर टाकून स्वारी बाहेर आली. समोरच लहानसा हौद होता. पाणी काठोकाठ भरले होते. जावईबुवांनी सरळ मुलाला उचलले आणि दोन्ही हातांनी काखेत धरून तोंडापर्यंत हौदात बुडवले.

गार पाण्याचा स्पर्श झाल्याबरोबर ते पोरगं एकदम शुद्धीवर आले आणि घाबरून ओरडू लागले.

जावईबुवा समाधानाने म्हणाले,

“हां. शाबास! ताप गेला बघ हं तुझा. ओरडू नकोस आता उगीच. आणखीन थोडीशी कळ काढ.”

आणि जावईबुवांनी पुन्हा त्याला पाण्यात बुडवले.

मुलगा मोठमोठ्यांदा ओरडू लागला. त्याबरोबर त्याचा बाप धावून आला. घरातली माणसेही पळत आली. त्यांनी ताबडतोब त्या मुलाला हौदाच्या बाहेर काढले. भराभर त्याचे अंग पुसून काढले आणि कपडे घालून, पांघरूण टाकून निजवले. वैद्यबुवांना बोलावणे पाठवले. वैद्यबुवांनी ताबडतोब येऊन औषध दिले. संध्याकाळपर्यंत मुलाचा ताप

उतरला. तो हसू खेळू लागला, तेव्हा सगळ्यांचा जीव खाली पडला. ते बघून जावईबुवा सगळ्यांना ऐटीने म्हणाले,

“बघा माझ्या युक्तीचा परिणाम! नुसती पट्टी ठेवली असती तर दोन दिवस लागले असते ताप उतरायला. दोनदा बुचकळलं तर हा परिणाम. आणखी थोडा वेळ बुडवलं असतं तर तासाभरात ताप उतरला असता!...”

□

# जावईबुवांचा कीचकवध

भुताखेतांच्या गोष्टीमुळे जावईबुवांचे जाणे पुन्हा थोडेसे लांबले. लोकांनाही त्यांचे फार कौतुक वाटले. कुणी कुणी त्यांना फराळाला बोलावले. कुणी तोंडभरून आशीर्वाद दिला. शेजारच्या गावानं तर कमालच केली. गावचे लोक नाटकाचे फार शोकिन. मधूनमधून पण एकसारखे नाटक करीत असायचे. जावईबुवांच्या पराक्रमावर खूश होऊन त्यांनी ठरवलं की, त्यांना नाटक पाहायला निमंत्रण द्यायचे. अनायासे गावात नाटक होणार आहे. मग त्या मंडळींना मुद्दाम बोलावलं तर जावईबुवांचं कौतुक केल्यासारखं होईल. आपलीही कला त्यांना पाहायला मिळेल.

असा विचार करून गावची चार प्रमुख माणसे निमंत्रण द्यायला आली. वाड्यात आल्यावर त्यांनी जावईबुवांची चौकशी केली. जावईबुवा फोडणीच्या पोह्यांचा समाचार घेत ओट्यावर बसले होते. सासरेबुवा, मेव्हणे सगळेच त्यांच्या जवळपास होते. फराळाचा कार्यक्रम जोरात चालला होता. जावईबुवांनी पातेलेभर फोडणीचे पोहे संपविले होते. आता आग्रह केला तर आणखी फक्त अर्धे पातेलेच घ्यायचे असा त्यांचा विचार होता.

तेवढ्यात ही मंडळी तिथे आली. त्यांचेही खाणे झाले. गप्पाटप्पा, ओळखीपाळखी झाल्यावर त्यांच्यापैकी एकजण म्हणाला, "जावईबुवा, आम्ही मुद्दाम तुम्हाला नाटकाचे निमंत्रण द्यायला आलोय. आमचं नाटक बघायला सगळ्यांनी यायचं. उद्या रात्रीच आहे."

जावईबुवा तांब्याभर पाणी पिऊन 'अऽऽबा' अशी ढेकर देत म्हणाले,

"नाटक? कसलं नाटक?"

"नाटक हो. आपलं पौराणिक!"

"म्हणजे ते काय असतं?"

"म्हणजे काय बरं का?" मेव्हणा समजावून सांगू लागला, "कुठलीतरी एक धार्मिक गोष्ट घ्यायची आणि ती आपल्यासमोर करून दाखवायची. निरनिराळी माणसं त्यात निरनिराळी कामं करतात. फार मजा असते. जाऊ या आपण पाहायला."

"कसली गोष्ट असते!"

"कसलीही असते. आता उद्या 'कीचकवध' करून दाखवणार आहेत."

"बाप रे!" जावईबुवांना आश्चर्य वाटले.

"कीचकवध? म्हणजे ठार मारून दाखवणार कीचकाला आपल्याला?"

"खरं ठार मारून नाही दाखवत. आपलं नाटकातलं."

"ह्यः! मग कीचकवध कसला आलाय तो? खोटा कीचकवध झाला तो!" जावईबुवांनी नापसंती दाखवली. "आपल्याला खोट्या गोष्टी नाही बुवा आवडत. खरंखुरं पाहिजे. खरा वध दाखवणार असाल तर येतो पाहायला."

गावकरी मंडळींना वाटले की, जावईबुवा थट्टाच करताहेत. म्हणून त्यांनी आश्वासन दिले. खरा कीचकवध दाखवू म्हणून कबूल केले. जावईबुवांना मजा वाटली. त्यांनीही यायचे मान्य करून टाकले. सासरे आणि मेव्हणे यांना मात्र भीती वाटू लागली. नाटक पाहताना जावईबुवा कीचकाला खरा ठार मारा म्हणून हट्ट धरून बसले तर काय घ्या! होय, त्याचा काही नेम नाही. जावईबुवांच्या डोक्यात काय येईल काही सांगता यायचे नाही. पण जाऊया तर खरे. त्यांनी कधी नाटक हा प्रकार पाहिलाच नाही. त्यांनाही पाहायला मिळेल. गावकरी मंडळींनी एवढ्या प्रेमाने बोलावले आहे. त्यांचा मान राखल्यासारखे होईल. नाटक नक्कीच रंगेल. जावईबुवांना कदाचित हे काही आठवणारही नाही.

शेवटी नाटकाला जायचे ठरले.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी दोन बैलगाड्या वाड्यासमोर उभ्या राहिल्या. एका गाडीत बायका. एका गाडीत पुरुष. सगळयांची तयारी झाली. गाडीत बसता-बसता जावईबुवांच्या हातातील जाड काठीकडे सगळयांचे लक्ष गेले. मेव्हणा म्हणाला,

“हे काय भावजी हातात?”

“ही-ही काठी आहे.”

“ते झाले हो. पण कशासाठी?”

“तो कीचकवध आहे ना, म्हणून!”

“म्हणजे?” मेव्हणा घाबरला.

“त्या कीचकाचा वध करायचा आहे ना? समजा, ऐनवेळेला नाही झाला भीमाच्या हातनं, तर मी आपला आहेच. एक काठी कीचकाच्या टाळक्यात घालायची. खलास! एका टोल्यात काम होईल.”

“अं-हं-हं! तसं काही करायचं नसतं हं नाटकात. आपण नुसतं नाटक बघायचं असतं.”

“वा! तिकडे मारामारी होणार अन् आपण गप्प बसायचं! भलतंच!”

आता जावईबुवा इथंच हट्ट धरून बसताहेत की काय अशी भीती सगळयांना वाटू लागली. शेवटी सासऱ्याने समजावून सांगितले की, कीचकाला काठीची फार भीती वाटते; काठी म्हटली की तो घाबरून जातो. लहानपणी त्याच्या बापाने त्याच्या डोक्यात एकदा काठी घातली होती आणि त्याचे कपाळ फुटले होते. तेव्हापासून काठी म्हटली की, कीचकाची गाळण उडते. तेव्हा आपण जर काठी नेली तर तो कामच करणार नाही. मग नाटक कसं होईल?

जावईबुवांनी नाईलाजाने काठी टाकून दिली. गाड्या निघाल्या. तासा-दीड तासात त्या गावी येऊन पोचल्या. गावच्या देशमुखांकडे गूळपाणी, खाणेपिणे झाल्यावर सगळी मंडळी मारुतीच्या देवळासमोर उभारलेल्या तात्पुरत्या थिएटरकडे गेली. सगळीकडे लोकांची गर्दी झाली होती. बत्त्या झगमगत होत्या. थोड्या वेळाने नाटक सुरू झाले.

नाटक पाहात असताना सासरे आणि मेहुणा दोघेही जावईबुवांना मधे घेऊन हुशारीने बसले होते. पण तरी नाटक जसजसे रंगात येऊ लागले तसतसे जावईबुवा एकसारखे

उसळ्या मारू लागले. बल्लवाच्या पाकघरात गमती पाहताना त्यांना भयंकर हसू आले. इतके की दोनतीनदा ते खो-खो करून मोठमोठ्यांदा हसले. त्यामुळे लोक त्यांच्याकडे वळून वळून बघू लागले. धर्मराजाचे शांत बोलणे ऐकून त्यांना भारी चीड आली. "याला लेकाच्याला काही कळतच नाही–" ते मेव्हण्याच्या कानात पुटपुटले, "अगदीच भित्री भागुबाई आहे बुवा!" पुढे सैरंध्रीचा हात कीचकाने ओढला तेव्हा मात्र जावईबुवा एकदम खवळले. "हां हां, काय चावटपणा चाललाय रे लेका? येऊ का तिथं?" ते ओरडले. त्याबरोबर पुन्हा लोक त्यांच्याकडे पाहायला लागले. कीचकाचे काम करणारा नटही बावचळून त्यांच्याकडे पाहायला लागला. तेव्हा जावईबुवांनी हाताचा गुद्दा करून त्याला ठोसे मारल्याचा अभिनय करून दाखवला. सासऱ्यांनी त्यांना पुन्हा खाली बसवले. पुन्हा नाटक सुरू झाले.

अगदी शेवटी मात्र जावईबुवांनी कमाल करून टाकली!

शेवटच्या प्रवेशात भीम आणि कीचक यांचे मल्लयुद्ध होते. जोराची मारामारी घडून येते आणि कीचक मरतो. तो प्रवेश सुरू झाला तसे जावईबुवा अस्वस्थ झाले. पहिल्यापासूनच ते तक्रार करीत होते की भीम फार हडकुळा आहे, त्याला ही गोष्ट जमायची नाही म्हणून! पण कुस्ती सुरू झाल्यावर मात्र त्यांना अजिबात राहवेना. एकदा भीम कीचकाच्या उरावर बसला. मग कीचक भीमाच्या छातीवर बसला. झटापट सुरू झाली. जावईबुवांचा चेहरा फारच चिंताक्रांत झाला. ते सासऱ्याला म्हणाले,

"आता या भीमाचं कसं होईल हो? एखाद्या वेळेस कीचक त्याला ठार मारील ना?"

सासरे त्यांना खाली बसवण्याचा प्रयत्न करीत म्हणाले,

"तसं होत नसतं. भीमच मारणार कीचकाला. तुम्ही गप्प राहून पाहा म्हणजे झालं."

"काय सांगताय काय! तो बघा भीम गेला पुन्हा खाली. आता तो कसला वर येतोय? आपण सगळ्यांनी त्याला मदत केली पाहिजे."

"छे: हो! भलतंच काहीतरी. तुम्ही बसा खाली."

पण जावईबुवांचे तिकडे लक्षच नव्हते. ताठ उभे राहून ते भीमाला तिथूनच सूचना देऊ लागले. पण भीमाचे काही तिकडे लक्षच जाईना. मग मात्र जावईबुवांना फार राग आला. "अगदी गाढव आहे बुवा हा भीम म्हणजे!" ते पुटपुटले. सैरंध्री जवळच घाबरून एका कोपऱ्यात उभी होती. तिला उद्देशून ते ओरडले,

"अगं, तू का उगीच उभी राहिली आहेस सटवे तिथं? पळ पळ लवकर. जा घरी."

जावईबुवांच्या ओरडण्यामुळे सगळीकडे गोंधळ सुरू झाला. सासरे आणि मेव्हणे त्यांना हात धरून खाली बसवू लागले. पण जावईबुवा फारच खवळले होते. त्यांनी ताड्दिशी उडी मारून स्टेजच्या दिशेने धाव घेतली. 'सरका, सरका बाजूला' असे ओरडून त्यांनी स्टेजवर उडी घेऊन कीचकाला एक जोरात ठोसा ठेवून दिला. इतक्या जोरात की, कीचकाने डोळे पांढरेच केले. तो मोठ्याने ओरडला,

"अगं आई आई!– मेलो मेलोऽ!"

"अरे वा! मघाशी त्या बिचारीचा हात धरलास त्यावेळी लाज नाही वाटली? आँ?"

असे म्हणून जावईबापूंनी पुन्हा कीचकाच्या टाळक्यावर एक टोला ठेवून दिला. भीम मधे पडू लागला, तेव्हा त्यालाही एक गुद्दा मारून त्याला पळवून लावले. हा प्रकार पाहिल्यावर सैरंध्रीनेही धूम ठोकली. भीम आणि कीचक दोघेही हातात हात घालून पसार झाले. इतकेच नव्हे तर प्रेक्षकांतले बरेच पळत सुटले. पोरे रडू लागली. बायका घाबरल्या.

सगळीकडे नुसता गोंधळ माजला.

नाटक तिथेच खलास झाले.

गावकरी मंडळींना पुन्हा भेटण्याचे धैर्य काही कुणाला झाले नाही. सासरेबुवांनी हळूच गाड्या जोडल्या. माणसे बसली आणि आपल्या गावाच्या दिशेने मुकाट्यानेच कूच केली. जावईबुवांना त्यांनी मोठ्या मुष्किलीने शांत करून स्टेजवरून खाली धरून आणले आणि गाड्या भरधाव सोडल्या.

थोडा वेळ गेला.

गार वारे डोक्याला लागल्यावर जावईबुवांचे डोके जरा थंड झाले. इकडेतिकडे पाहात ते सगळ्यांना उद्देशून म्हणाले, “आता आमच्या गावी पण असंच नाटक करायचं. मीच भीम होईन. म्हणजे कटकट नाही. तुमच्या या कीचकाला तिकडं पाठवून द्याल का?”

□

# ‘श्री’ लहान झाली!

जावईबुवांना सासुरवाडीला येऊन बरेच दिवस झाले. त्यांना परत पाठवून द्या म्हणून पत्र आले. पत्र आले तेव्हा घरात कोणीच नव्हते. दुपारची वेळ होती. दोघेही मेहुणे कुठेतरी बाहेर गेले होते. सासरे वामकुक्षी करीत होते. त्यांचाही डोळा लागला होता. ओसरीवर घरातल्या बायका निवड-टिपण करीत होत्या. अशा वेळी गावातला एक ओळखीचा माणूस आला आणि चिठ्ठी देऊन उभा राहिला. दुसरे कुणी जवळपास नव्हते म्हणून बायकोने जावईबुवांनाच हाक मारली. जावईबुवा अंथरुणावर लोळत होते. बेसनाच्या लाडूचे जेवण झाल्यामुळे त्यांचे पोट गच्च झाले होते. स्वप्नेदेखील त्यांना लाडूचीच पडत होती. लाडूचा एक प्रचंड डोंगर आहे आणि त्या डोंगरावर बसून आपण एकेक लाडू खात आहोत असे स्वप्न त्यांना पडत होते. दहापाच लाडू खाऊन झाले. तेवढ्यात बायकोने हाक मारली. हलवून जागे केले.

जावईबुवा अजून झोपेतच होते. अंथरुणावर उठून बसून ते म्हणाले,

“का? तुला पण लाडू पाहिजे का? घे. घे. अगदी लाजू नकोस, चिक्कार घे.”

बायकोने त्यांचे डोके धरून गदागदा हलवले.

“अहो, झोपेत का आहात? कसले लाडू देताय मला?”

“राघवदास, बुंदी, रव्याचे... सगळे आहेत.” जावईबुवा पेंगत म्हणाले.

“अहो, असं काय करताय? बाहेर कुणी माणूस आलाय.”

“त्याला पण लाडू देऊन टाकू.”

“त्यानं चिठ्ठी आणलीय घरची. काय आहे पाहा तरी खरी.”

बायकोने बराच वेळ कानाशी आरडाओरडा केला. मग जावईबुवा जागे झाले. लाडवाच्या डोंगरावरून खाली उतरून ते माजघरात आले. डोळे चोळीतच त्यांनी बायकोला विचारले,

“चिठ्ठी?”

“हो.”

“अन् अण्णांनी पाठविली?”

“हो.”

“अन् ती इथं आली?”

“हो.”

“ती कशी काय बुवा आली? तिला घर कसं सापडलं नेमकं हे?”

“इथला माणूस घेऊन आला.”

“अच्छा! मोठा हुशार दिसतो हा माणूस.”

“उठा आता ती चिठ्ठी पहा काय आहे ती.”

जावईबुवा डोळे चोळीतच बाहेर आले. ओसरीवर येऊन त्यांनी त्या माणसाकडे जरा निरखून पाहिले. मग विचारले,

“तू चिठ्ठी आणलीस घरची आमच्या?”

तो माणूस जावईबुवांना रामराम घालून म्हणाला, “व्हय जी, तुमच्या अण्णांनी दिली. म्हणाले, गेल्यागेल्या हा कागुद घरी नेऊन दे.”

“असं?” जावईबुवांना आश्चर्य वाटले. “आमची कालवड आता बरी आहे ना? मी आलो तेव्हा जरा लंगडत होती म्हणून विचारतो.”

“ते काय मी बघितलं नाही.”

“मग काय बघितलंस काय?... आमची मनी मांजरी व्याली का? तेही तुला ठाऊक नाही?”

त्या माणसाने मान हलवली.

“हात् लेका! अगदीच अडाणी गोळा आहेस! एवढ्या साध्या गोष्टी दिसू नयेत म्हणजे मजाच आहे. बरं, त्या शेजारच्या मन्याला बेंड झालं होतं, ते बरं झालं का? का तेही तुला ठाऊक नाही? छान छान!”

जावईबुवा एकामागून एक प्रश्न विचारू लागले. तो बिचारा माणूस घाबरूनच गेला. शेवटी बायको त्याच्या मदतीला धावली. त्याच्या हातातील चिठ्ठी घेऊन तिने नवऱ्याजवळ दिली आणि म्हणाली.

“ते राहू द्या बरं बाजूला. ही चिठ्ठी वाचा आधी. काय लिहिलंय पाहा...”

“ते वाचतो गं. पण म्हटलं जरा चौकशी करावी थोडीशी आधी. पण या बाबाला तर काही म्हणजे काहीच ठाऊक नाही.”

“वाचा, आधी पत्र वाचा.”

जावईबुवा रागावून बोलले, “पत्र? पत्र कुठं आहे? छान? ही तर नुसती चिठ्ठी आहे? काय रे हरामखोर, पत्र यात होतं ना? कुठं हरवलंस वाटतं?”

तो माणूस कंटाळून म्हणू लागला,

“हा एवढा कागुद दिला बगा त्यांनी. जास्त काय मला ठावं नाही. येतो मी, रामराम.”

आणि रामराम करून तो आपल्या कामाला निघून गेला. जावईबुवा त्यांच्याकडे बोट दाखवून म्हणाले,

“धरा, पकडा त्याला. नुसती चिठ्ठी आणली त्यानं. पत्र पळवलं.”

बायको कमरेवर दोन्ही हात ठेवून ठसक्यात म्हणाली,

“आता मात्र शर्थ झाली तुमची हो!”

“का बुवा? काय झालं?”

“अहो, चिठ्ठी अन् पत्र एकच.”

“चिठ्ठी अन् पत्र एकच? असं कसं होईल?”

“चिठ्ठी म्हणजेच पत्र. कागदावर लिहिलं म्हणजे चिठ्ठी म्हणायची, कार्डावर लिहिलं म्हणजे पत्र म्हणायचं.”

“अरेच्या! असं आहे काय?” जावईबुवांच्या डोक्यात प्रकाश पडला.

“मग हे मला आधी सांगायचं नाहीस? मूर्ख कुठली!”

“बरं बरं, वाचा आधी पत्र. काय म्हणताहेत मामंजी सांगा तर खरं!”

“अरे हो! ते राहूनच गेलं.”

जावईबुवांनी हातातली चिठ्ठी नीट समोर धरली आणि उलगडली. लिहिण्यावाचण्याच्या नावाने आपला आनंदच होता. कसेबसे र ट फ करीत वाचता येत होते इतकेच. पण ते दुसऱ्या कोणाला समजू नये म्हणून त्यांनी ऐटीत चिठ्ठी हातात धरली आणि तितक्याच ऐटीत उलगडली. मग सगळी घडी उलगडून त्यांनी पत्राची सुरुवात पाहिली आणि–

–आणि एकदम मोठ्यांदा हंबरडा फोडला!

जावईबुवांनी एकदम गळा काढलेला पाहून सगळ्या बायका घाबरून गेल्या. बिचारी बायको रडू लागली. मेहुणीला रडू कोसळले. ते बघून सासूबाईही घाबरून गेल्या. त्यांना काही सुचेना. त्यांच्या काळजात एकदम धस्स झाले. काही वेडीवाकडी तर बातमी नाही ना पत्रात? तसेच असले पाहिजे. त्याशिवाय जावईबुवा असे कसे करतील? कुणी मेलेबिले तर नाही?

कसाबसा धीर करून सासूबाईंनी विचारले,

“काय झालं हो जावईबुवा?”

जावईबुवा मोठमोठ्यांदा रडत होते. चांगले मोठ्यांदा रडत होते. सासूबाईंनी दोनतीनदा हाच प्रश्न विचारला, तेव्हा डोळे पुसून रडक्या तोंडाने ते म्हणाले,

“आमचे अण्णा–”

आणि त्यांनी मोठ्यांदा गळा काढला!

आता मात्र सासूबाईंची खात्री झाली. नक्की पोरीच्या सासऱ्याला काहीतरी झाले. काहीतरी अपघात झाला आणि त्यात आपले व्याही आटोपले. त्याबरोबर त्याही रडायला लागल्या. त्या रडत आहेत हे पाहून बाकीच्या दोघीही रडू लागल्या. मोठमोठ्यांदा रडू लागल्या. जावईबुवांचे रडणे जरा कमी झाले होते. पण सगळ्या बायका रडताहेत पाहिल्यावर ते पुन्हा मोठ्यांदा रडू लागले. जिकडेतिकडे असा रडण्याचा दंगा उसळला. माजघरात झोपलेले सासरे दचकून जागे झाले. तेही घाबरून बाहेर आले. कामासाठी बाहेर गेलेले मेहुणेही तेवढ्यात घरी आले. घरात चाललेली रडारड पाहून ते अगदी घाबरून गेले. जावईबुवांच्या हातात कसले तरी पत्र आहे आणि ते रडताहेत हे पाहून त्यांची खात्री झाली की, जावईबुवांच्या घरचे कुणीतरी मेले असावे. मग मेहुणेही ढसाढसा

रडू लागले. सासरे तर मटकन खालीच बसले. त्यांनीही उपरणे डोळ्याला लावले. थोडा वेळ अशी रडारडी झाली; मग सासरेबुवा उठले. जावयाच्या जवळ जाऊन त्यांनी त्यांच्या पाठीवरून हात फिरवला. त्याबरोबर जावईबुवा पुन्हा स्फुंदत म्हणाले,

"आमचे अण्णा... श्री..."

"चालायचं. देवाची मर्जी! आपण काय करणार!"

"खरं आहे."

"आता रडणं बंद करा पाहू."

"हे पाहा, केलं." जावईबुवांनी डोळे पुसले.

"कुणाचं पत्र आहे?" सासऱ्यांनी चौकशी सुरू केली.

"अण्णांचं!" जावईबुवांनी शांतपणे उत्तर दिले.

"आँ?"

सासरे गारच झाले. अण्णा मेले म्हणून बातमी अन् पत्रही अण्णांचं? म्हणजे आहे काय हा प्रकार? का स्वत: मरून अण्णांनी स्वत:च हे पत्र लिहिलं आहे? काय भानगड काय आहे ही?

"जावईबुवा, काय लिहिलंय पत्रात अण्णांनी?"

"मी अजून कुठं पत्र वाचलंय? वाचायचंय." जावईबुवा रडक्या तोंडाने म्हणाले. मग त्यांनी एकेक अक्षर लावून सबंध पत्र वाचले. सासऱ्यांनी त्यांच्या हातातील पत्र घेऊन भराभरा वाचले. पत्र वाचून झाल्यावर ते आश्चर्याने म्हणाले,

"अहो, सगळं ठीक आहे असं तर लिहिलंय पत्रात."

"हो, सगळं ठीक आहे." जावईबुवा कष्टाने म्हणाले.

"तुम्हाला आता पाठवून द्या लवकर म्हणून निरोप आहे."

"हा निरोप आहे खरा." जावईबुवांनी पुन्हा मुंडी हलवली.

"अहो, मग एकदम रडायला काय झालं?"

जावईबुवा तोंड एवढेसे करून म्हणाले,

"अहो, सुरुवातीला पत्रावर ती 'श्री' लिहिलीय ती बघा ना?–"

"बघितली! काय झालं काय?"

"किती बारकी अन् हडकुळी काढलीय ती."

"बारकी अन् हडकुळी? म्हणजे काय?"

सासऱ्यांनी आश्चर्याने प्रश्न केला. सगळे जावईबुवांच्या तोंडाकडे टकमका पाहू लागले.

रडक्या तोंडानेच जावईबुवा हळूहळू म्हणाले,

"लहानपणी मी 'श्री' शिकलो होतो. त्यावेळी किती मोठी होती ही 'श्री'. अन् या पत्रावर बघा ना, किती लहान अन् हडकुळी झालीय ती. फार खराब झाली तिची प्रकृती. म्हणून मला एकदम रडू आले."

सासऱ्यांनी कपाळाला हात लावला. सगळ्यांनी सुटकेचा निःश्वास सोडला. सर्वांना हायसे वाटले. थोडा वेळ शांतता पसरली. मग जावईबुवांना एकदम काहीतरी आठवलं. ते मोठ्यांदा हसून म्हणाले,

"हा: हा:! आता आलं लक्षात. त्या मघाच्या माणसाने चिठ्ठी आणली ना, त्यानंच वाटेत या 'श्री'ला हडकुळं करून ठेवलं असेल! नक्की सांगतो! चावट लेकाचा!..."

□

# अस्वल आणि चोर

दिवाळी मोठ्या थाटामाटात पार पडली. रोज फराळ, रोज पक्वान्ने यात चार दिवस कसे गेले हे कळलेही नाही. जावईबुवांचे घरी जायचे दिवस जवळ आले. आता उद्या निघायचे हे ठरले. सासूबाईंनी आदल्या दिवशी रात्री पुन्हा थाटमाट केला. पंक्ती बसल्या. आता आज गोड तरी काय वाढावे असा प्रश्न पडला होता. पण मळयातून संध्याकाळी गडी एक मोठे मडके भरून ताजी ताजी काकवी घेऊन आला आणि त्यांचा प्रश्न सुटला. जेवताना पोळीबरोबर त्यांनी सगळयांना काकवी वाढली. जावईबुवांना काकवी हा प्रकार माहीत नव्हता. त्यांच्याकडे ऊस हा प्रकार नव्हताच. त्यामुळे उसाचे गुऱ्हाळ, काकवी हे प्रकार त्यांनी कधी बघितलेच नव्हते.

वाढता वाढता सासूबाई जावईबुवांच्या पानापाशी आल्या. हातातले काकवीचे भांडे तिरपे करू लागल्या, तेवढ्यात जावईबुवांनी पानावर आडवा हात धरला.

“छे: छे:! अजिबात नको.”

“अहो घ्या. छान आहे.”

“काय भानगड आहे ती? काळं काळं, तांबूस, पातळ–”

“काकवी म्हणतात तिला.”

“कसला कवी?”

“कवी नव्हे हो, काकवी–” मेव्हणे खुलासा करून सांगू लागले.

“ऊस नसतो का, त्याचा रस असतो–”

“असू द्या, असू द्या.”

“तो रस खूप उकळतात–”

“तो कशाला?” जावईबापूंना आश्चर्य वाटले.

“गूळ करतात रस उकळून.”

“बरं–”

“त्या वेळेला रस उकळताना जी तयार होते ती काकवी चांगली गोड असते. चवदार. घ्या थोडी –”

“नको बुवा.”

सगळयांनी खूप आग्रह केला. पण जावईबुवा काही ऐकेनात. खूप आग्रह झाल्यावर एकदा त्यांना वाटले की थोडी घ्यावी म्हणून. पण नको म्हणून एकदा म्हटल्यावर पुन्हा ‘बरं, घेतो’ म्हणणे बरे दिसणार नाही असे त्यांना वाटले. ते सारखे नको नको म्हणू लागले तेव्हा सासूबाईंचा निरुपाय झाला. वाढता वाढता त्या थांबल्या. दुसऱ्या पानांकडे वळल्या.

शिंक्यावरची मातीची घागर पुन्हा त्यांनी शिंक्यावर ठेवली.

या गडबडीत काकवीचे चार-दोन थेंब पानात पडले होते. जावईबुवांनी एक थेंब हळूच चाटून पाहिला. 'अरे वा! छान लागतेय की–' असे मनात म्हणत त्यांनी इकडेतिकडे पाहिले. कुणी बघत नाही असे पाहून त्यांनी उरलेले चार-दोन थेंबही हळूच चाटून टाकले. मस्त आहे. आपण उगाचच नको म्हणालो. घेतली असती तर पोटभर खाल्ली असती. आता उद्या तर गावाला निघायचे. आता पुन्हा कुठून मिळणार हा झकास पदार्थ. छट! आपले चुकले. काय करावे बरे?

जेवण झाल्यावर बराच वेळ जावईबुवा विचार करीत होते. डोके खाजवीत होते. ही काकवी एका मोठ्या मातीच्या घागरीत ठेवलेली आहे आणि ते मोठे मडके स्वैपाकघरात एका शिंक्यावर ठेवलेले आहे, एवढे त्यांनी पाहिले होते. बस्स! ठरले. रात्री सगळी निजानीज झाली की, हळूच उठायचे. स्वैपाकघरात जायचे, काहीतरी करून ते मडके खाली काढायचे आणि पोटभर काकवी प्यायची. पुन्हा मडके जागेवर ठेवून आपण गुपचूप अंथरुणावर येऊन पडायचे. या कानाचे त्या कानाला कळणार नाही. अगदी खाशी युक्ती आहे.

रात्र झाली.

सगळीकडे निजानीज झाली. जिकडेतिकडे शांत झाले. जावईबापूंनी गाढ झोपी गेल्याचे सोंग बरोबर आणले. बायको तांब्याभांडे घेऊन आली तेव्हा ते मुद्दामच मोठमोठ्यांदा घोरत होते. बायकोने ते पाहिले. मग तीही शेजारच्या अंथरुणावर आडवी झाली. दिवसभर काम करून करून ती चांगलीच दमली होती. पाचदहा मिनिटांत ती पण गाढ झोपी गेली.

सगळीकडे अगदी सामसूम झाले.

मध्यरात्र होऊन गेली. जावईबुवा हळूच उठले. हां, ही चांगली वेळ आहे. कुण्णी जागे नाही. आता आपले काम बिनबोभाट पार पडेल.

दबकत दबकत जावईबुवा निघाले. स्वैपाकघरात घुसले. स्वैपाकघरात एक लहानशी चिमणी कोनाड्यात मिणमिणत होती. अंधुक उजेड पडला होता. त्या अंधुक उजेडात ते शिंके आणि त्यात ठेवलेली ती मातीची घागर स्पष्ट दिसत होती.

जावईबापूंनी हात वर करून ती घागर काढून घेण्याचा प्रयत्न केला. पण शिंके जरा उंचावर होते. जावईबुवाही तसे फारसे उंच नव्हते. घागर काही नीट हाताला लागेना.

आता काय करावे बुवा?

शोधक नजरेने जावईबापूंनी इकडेतिकडे पाहिले. स्वैपाकघरात एका कोपऱ्याला धुणे वाळत घालायची काठी दिसली. एकदम त्यांच्या डोक्यात प्रकाश पडला. हां, ही छान युक्ती आहे. ही काठी घेऊन मडक्यावर हळूच हाणावी. छानसे भोक पडेल. काकवी खाली गळायला लागेल. आपण धारेला तोंड लावावे; पोटभर काकवी प्यावी आणि गुपचूप पळावे. सकाळी कळेल लोकांना. कळले तर कळले. त्यांना वाटेल मांजराने काहीतरी उद्योग केला. आपण काकवी प्यालो हे कुणाला कळणारही नाही. झकास; असेच केले

पाहिजे.

जावईबुवांनी धुण्याची काठी उचलली. बरोबर नेम धरला आणि एक तडाखा घागरीवर आणला.

नेम नीटसा लागला नाही. पण त्या घागरीला अगदी लहानसे छिद्र पडले. थेंब थेंब काकवी खाली गळू लागली. जावईबापूंनी तोंड खाली धरले. एकेक थेंब तोंडात पडू लागला. पण अशा एकेका थेंबाने त्यांचे समाधान होईना. असे किती वेळ काकवी खात बसायचे! जरा मोठे भोक पाडले तर? चांगली धार लागेल आणि पटदिशी आपले काम होईल.

महाराजांनी पुन्हा एकदा पवित्रा घेतला. दातओठ खाऊन पुन्हा एक जोरदार तडाखा घागरीला लगावला. आता मात्र चांगले भोक पडले. जोरदार धार बाहेर सांडू लागली. जावईबुवांनी तोंड वर करून खालीच मुक्काम ठोकला. हातात काठी तशीच धरून ते गटागटा काकवीच पिऊ लागले. पितापिता मजेने त्यांनी पुन्हा एक तडाखा घागरीला लगावला.

त्याबरोबर ती मातीची घागर एकदम फुटलीच. मोठा आवाज झाला. काकवीचा लोटच्या लोट जावईबुवांच्या अंगावर सांडला. उघड्याबंब सर्वांगावर काकवीच काकवी झाली.

सांडणाऱ्या काकवीचा आवाज, फुटक्या मडक्याचा खाली पडताना झालेला आवाज– सगळे घर एकदम जागे झाले. आरडाओरडा सुरू झाला. स्वैपाकघरात काहीतरी गडबड आहे हे सर्वांच्या ध्यानात आले होते. प्रत्येकजण तिकडेच निघाला.

“स्वैपाकघरात काहीतरी आपटलंय धबेल करून–”

कुणीतरी म्हणाल्याचे ऐकू आले. जावईबुवा भयंकर घाबरले. आता अशा अवस्थेत आपल्याला सगळ्यांनी पाहिले तर? छे: छे:! सगळे इथं यायच्या आत आपण धूम ठोकली पाहिजे. कुठंतरी लपून बसलं पाहिजे.

जावईबुवा तशाच काकवी माखलेल्या अंगाने उठले. धूम पळाले. बाहेरच्या अंधाराचा फायदा घेऊन ते पळत सुटले ते शेतीमाल साठवण्याची अडगळीची खोली होती त्या खोलीत येऊन धडकले. खोलीत शेतातला कापसाचा ढिगारा पडला होता. दार लावून घेऊन त्यांनी त्या ढिगाऱ्याखाली घाईघाईने उडी मारली. कापूस अंगावर घेऊन ते त्या ढिगाऱ्यात झकास दडून बसले.

गंमत अशी झाली होती की, याचवेळी नेमके दोन चोर घरात शिरले होते. घरातल्या ट्रंका-पेट्या उघडून पातळे, दागिने पिशवीत कोंबून ते परत जाण्याच्या विचारात होते. एवढ्यात हा आरडाओरडा झाला. त्यामुळे चोरही घाबरले. त्यांना वाटले, आपलाच उद्योग कुणाच्यातरी लक्षात आला. तेही धूम पळाले आणि त्या अंधारात कुठेतरी लपण्यासाठी पळत सुटले. नेमके त्या अडगळीच्याच खोलीत येऊन पोहोचले.

धाडकन दार वाजल्याबरोबर जावईबापू एकदम दचकले. उठून उभे राहिले. सगळं अंग काकवीने चिकट झालेले. त्यातून कापसाच्या ढिगाऱ्यावर लोळण घेतलेली. त्यांच्या

सर्वांगाला कापूस चिकटलेला. ते उभे राहिल्याबरोबर एखादे पांढरे अस्वल जसे दिसावे तसे दिसू लागले.

अडगळीच्या खोलीत एकदम पांढरे अस्वल समोर दिसल्यावर एवढे मोठे आडदांड चोर पण तेही घाबरले. जावईबुवा त्या ढिगाऱ्यावर उभे होते. ते चालण्याचा प्रयत्न करू लागले. पण कापसाच्या ढिगाऱ्यावरून चालणार कसे? वेडेवाकडे हातवारे, इकडे तोल जातोय, तिकडे तोल जातोय अशी त्यांची स्थिती झाली. अस्वल जणू नाचते असाच देखावा दिसू लागला. त्यांची दातखिळीच बसली. हातपाय लटलट कापू लागले.

एवढ्यात ते अस्वल नाचता नाचता म्हणाले,

"कोण रे तुम्ही? इथं काय करताय?"

आता मात्र कहर झाला. अस्वल नाचते ते नाचतेय आणि वर माणसासारखे बोलूही लागलेय हे पाहिल्यावर चोरांनी डोळे पांढरेच केले. त्यातला एक फेफरे येऊन खाली कोसळला. दुसरा एकदम किंचाळला–

"मेलो... मेलो... धावा..."

अडगळीच्या खोलीतून एकदम आरडाओरडा ऐकू आला तसे स्वैपाकघरातील मंडळी धावत तिकडे आली. पाहतात तो एक चोर बेशुद्ध पडलेला, दुसरा लटालटा कापत उभा. हातातील दागिन्यांचा डबा खाली पडलेला. त्यातले दागिने इकडेतिकडे जमिनीवर पडलेले.

– आणि एक पांढरे अस्वल विचित्र हातवारे करीत कापसाच्या ढिगाऱ्यावर उभे!...

त्याबरोबर घरची मंडळीही एकदम भेदरलीच. हा काय प्रकार आहे हे त्यांनाही कळले नाही. एकदोघांची बोबडीच वळली. काहींनी एकमेकांना घाबरून मिठ्याही मारल्या. तेवढ्यात जावईबुवा खदाखदा हसून बायकोला म्हणाले,

"अगं, मला ओळखलं नाहीस? कमाल आहे तुझी."

त्याबरोबर बायकोही भिऊन किंचाळली. पळत पळत घरात गेली.

हळूहळू सगळा प्रकार ध्यानात आला.

जावईबापूंच्या काहीतरी उद्योगामुळे चोर सापडले आणि फार मोठी चोरी टळली हे कळल्यामुळे सर्वांनाच त्यांचे भारी कौतुक वाटले. जो तो त्यांची स्तुती करू लागला.

सकाळी कापूस, काकवी हा सगळा प्रकार धुवून काढून अंग स्वच्छ झाल्यावर जावईबुवा डौलाने म्हणाले,

"मी त्या चोराला त्या काठीनेच मरेस्तोवर बदडून काढणार होतो. पण काठी चुकून काकवीला लागली, ती सगळी अंगावर सांडली. मग दुसरी युक्ती केली. म्हटले! अस्वल होऊन दणका द्यावा त्यांना. चोऱ्या करतात लेकाचे!..."

...आणि मग समोर आलेल्या स्वादिष्ट पदार्थांची चव घेत त्यांनी मोठी ढेकर दिली.

☐